नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक ३८ * * अकोला * शुक्रवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## वाहन दरीत कोसळले : ३ जवानांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. ७ :
जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यातील बसंतगड भागात गुरुवारी सकाळी १०:३० वाजता सीआरपीएफ जवानांचे एक बंकर वाहन २०० फूट खोल दरीत कोसळले. या अपघातात ३ जवानांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले. ५ जवानांची प्रकृती गंभीर आहे.

सैनिकांच्या एका पथकाला घेऊन जाणारे वाहन रस्त्यावरून घसरले आणि एका उंच उतारावरून खड्ड्यात पडले. घटनास्थळावरून मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर अनेक जखमी सैनिकांना गंभीर अवस्थेत बाहेर काढण्यात आले आहे. त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बंकर वाहनात २१ सैनिक होते.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## कबुतरांच्या पंखात आरोग्य

कबूतरांच्या बाबतीत उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. गेली काही वर्ष कबुतरांना भर वस्तीमध्ये दाणे खाऊ घालण्याचा कार्यक्रम परंपरा किंवा धार्मिक कृती अथवा सेवेच्या नावाखाली सुरू असतो. कबूतर हा अत्यंत उपयुक्त प्राणी आहे असे जुन्या काळात म्हटले जायचे. कबूतर म्हणजे जुन्या काळातील डाकसेवा होती नळ आणि दमयंती यांच्या प्रेमाच्या कथेत राजहंस हा सुद्धा पक्षीच होता. तात्पर्य असे की पक्षांविषयी सहानुभूती, प्रेम आणि भूतदया सर्वांच्या मनात असतेच. त्यामुळे मुंबईसारख्या शहरात कबूतरखाने आहेत. अनेक श्रीमंतांच्या घरात म्हणजे गॅलरीत किंवा गच्चीवर कबुतरांसाठी खाद्यान्न पुरविले जाते. मात्र आता मुंबईच्या उच्च न्यायालयाने असा आदेश काढला आहे की, या कबुतरांना अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात दाणे खायला घालून त्यांची संख्या वाढवणे म्हणजे आसपास राहणाऱ्या मनुष्यांच्या आरोग्यासाठी हानीकारक आहे. उच्च न्यायालयाने नोंदवलेले हे मत म्हणजे कायदाच असतो. गेली काही दशके परंपरा आणि धार्मिक भावना म्हणून कबुतरांना दाणे टाकत राहणे हे धार्मिक किंवा पुण्यकर्म आहे असे समजून हे कार्य अजूनही सुरूच आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाला या लोकांचा विरोध आहे असे नाही. अनेकांना हे आदेश अजून ठाऊकच नाहीत, केवळ अज्ञानापोटी धार्मिक श्रद्धा म्हणून अजूनही दाणे टाकणे सुरूच आहे. न्यायालयासमोर पुरावे सादर झालेले आहेत त्यावरून न्यायालय म्हणते की, काही वर्षांपूर्वी सुरू झालेली परंपरा आणि धार्मिक भावनेपेक्षा लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्या आदेशाचे उल्लंघन करू नका असे न्यायालयाने कठोरपणे म्हटलेले आहे. कोणतेही न्यायालय धार्मिक भावना दुखावतील असा आदेश देणार नाही. ज्या अर्थी न्यायालयाने हा आदेश दिलाय त्याअर्थी परिस्थिती निश्चितपणे गंभीर आहे. हे आपण मान्य करायलाच पाहिजे. जनतेच्या आरोग्याची आणि भावनांची काळजी घेणे हे सरकारचे कर्तव्य आहे पण आता सरकारच्या भूमिकेपेक्षा न्यायालयाच्या आदेशाला अधिक वजन आहे. सरकारी कायदे कसे मोडावे आणि त्यातून कसे बाहेर पडावे यासाठी काळे डगलेवाले तयारच असतात. पण भूतदया करून स्वर्गात स्थान मिळवण्याच्या उद्देशाने कबूतर खाण्याला खाना देणे सुरू आहे. त्यामुळे आपल्या मानवी आरोग्यावर परिणाम होतोच, असे दिसल्याने भूतदया, धर्मभावना या गोष्टींना अधिक चालना देण्यापेक्षा न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे. तसेच सरकारनेही लोक जागरणासाठी किंवा जागृतीसाठी याचा प्रचार करावा. एकूणच हा प्रश्न कितीही पारंपरिक आणि धार्मिक भावनेशी निगडित असला तरी ज्याप्रमाणे न्यायमूर्ती म्हणत आहेत त्याप्रमाणे धार्मिक, भावनिक गोष्टींपेक्षा जन आरोग्य जास्त महत्त्वाचे आहे. आरोग्याला कबुतरांच्या पंखात उडून जाऊ देऊ नका, हीच आजची शिकवण आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## रस्त्यावर व्यायाम करणाऱ्या ६ मुलांना ट्रकने चिरडले

# चौघांचा मृत्यू, दोघे अत्यवस्थ

गडचिरोली - नागपूर
महामार्गावरील घटना

गावकऱ्यांचा संताप उफाळला

मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी
४ लाख रुपयांची आर्थिक मदत

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ७ :
सकाळी रस्त्यावर व्यायाम करणाऱ्या ६ अल्पवयीन मुलांना ट्रकने चिरडल्याची भयंकर घटना गडचिरोली जिल्ह्यातील काटली येथे घडली आहे. या अपघातात ४ मुलांचा जागीच मृत्यू झाला असून, दोघे अत्यवस्थ आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.





काटली गावातील मुले रोजच्याप्रमाणे पहाटेच्या सुमारास व्यायाम करण्यास गावालगतच्या नाल्याजवळ गेले होते. सकाळी ५.१० च्या सुमारास ही मुले रस्त्याच्या काठावर बसली असतांना भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने सहाही बालकांना चिरडले.

यात टिंकू नामदेव भोयर (१४) व तन्मय बालाजी मानकर (१६) यांचा जागीच मृत्यू झाला. तर सुशात दुर्योधन मेश्राम (१४) आणि तुषार राजेंद्र मारबते (१४) यांचा जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. गंभीर अवस्थेत असलेल्या क्षितिज तुलसीदास मेश्राम व आदित्य धनंजय कोहपरे यांना नागपूर येथे हेलिकॉप्टरने हलविण्यात आले आहे. दोघांचीही प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

या घटनेमुळे संतप्त नागरिकांनी राष्ट्रीय महामार्गावर चक्काजाम करून आक्रोश व्यक्त केला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी संतप्त जमावाला शांत करून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. वाहनाचा शोध घेण्यासाठी सर्वत्र नाकाबंदी करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेवर शोक व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. आरमोरी-गडचिरोली महामार्गावर एका अपघातात ४ युवकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. या घटनेत युवक जखमी दोघांना नागपूर येथे पाठवण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात आली असून, जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च राज्य सरकार करेल, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

## किमत तो चुकानी ही होगी...

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी अमेरिकेच्या टॅरिफचा उल्लेख न करता सांगितले की, आपल्या शेतकऱ्यांचे हित हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. भारत आपल्या शेतकरी, पशुपालक आणि मच्छीमार बंधू-भगिनींच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही.



गुरुवारी दिल्लीत एमएस स्वामीनाथन शताब्दी आंतरराष्ट्रीय परिषदेत पंतप्रधान मोदी म्हणाले, मला माहिती आहे की मला वैयक्तिकरीत्या मोठी किंमत मोजावी लागेल, परंतु मी त्यासाठी तयार आहे. अमेरिकेने भारतावर ५०% कर लादण्याची घोषणा केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी पंतप्रधान मोदींचे हे विधान आले आहे. खरंतर अमेरिका भारताच्या कृषी आणि दुग्ध क्षेत्रात स्वतःच्या अटींसह प्रवेश करू इच्छिते. अनेक बैठकांच्या फेऱ्यांनंतरही भारत यासाठी तयार नाही.

मोदी गुरुवारी दिल्लीत आयोजित एमएस स्वामीनाथन शताब्दी आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झाले. मोदी म्हणाले, स्वामीनाथन यांनी देशाच्या अन्न सुरक्षेला त्यांच्या जीवनाचे ध्येय बनवले. त्यांनी एक अशी जाणीव जागृत केली जी येणाऱ्या शतकानुशतके भारताच्या धोरणांना आणि प्राधान्यांना मार्गदर्शन करत राहील.




## महाराष्ट्रात ५ महिन्यांत १ कोटी मतदारांची भर

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :
कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरूवारी पुन्हा एकदा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतचोरी झाल्याचा आरोप केला. महाराष्ट्रात अवघ्या ५ महिन्यांत १ कोटीहून अधिक मतदारांची मतदार यादीत भर पडली. विशेषतः एकाच मतदाराने महाराष्ट्रासह कर्नाटक व उत्तर प्रदेशातही लागोपाठ मतदान केले. या गैरव्यवहारात भाजप व निवडणूक आयोगाने हातात हात घालून काम केले, असे ते म्हणाले. राहुल यांनी यासंबंधी काही ठोस पुरावेही सादर केलेत.

राहुल गांधी यांची आज नवी दिल्लीत पत्रकार परिषद झाली. त्यात त्यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मतांचा मोठा घोटाळा झाल्याचा आरोप केला.

### राहुल गांधी यांचा पुराव्यांसह आरोप




### डोक्यातील चीप चोरीला

महाराष्ट्रात आणि देशात कुठेही मतदानाची चोरी झालेली नाही. तर राहुल गांधी यांच्या डोक्यातील चीप चोरीला गेली असल्याचा पलटवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. राहुल गांधी प्रत्येक वेळी खोटे बोलून पळून जातात. आगामी काळातील निवडणुकीत त्यांना पराजय दिसत आहे. आधीच कव्हर फायरिंग साठी ते असे आरोप करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## सरकारला धारेवर धरा!

### 'शिवसेना' खासदारांना उद्धव ठाकरेंचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ७ :
उद्धव ठाकरे हे सध्या दिल्लीत आहेत. या दरम्यान ते इंडिया आघाडीच्या बैठकीला देखील उपस्थित राहणार आहेत. त्याआधी त्यांनी त्यांच्या पक्षाच्या खासदारांची बैठक घेत काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. जनतेच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरा, त्यांना सळो की पळो करुन सोडा, असे आदेशच उद्धव ठाकरे यांनी आपल्या खासदारांना दिले आहेत.



उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत खासदार संजय राऊत यांच्या निवासस्थानी त्यांच्या शिवसेनेतील लोकसभा आणि राज्यसभा खासदारांची एकत्रित बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी मोदी सरकारवर देखील टीका केली. सत्ता हेच मोदी सरकारचे ध्येय आहे, त्यांना जन हिताशी काही देणे घेणे नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

मात्र आपल्या पक्षाचा जन्मच मुळात जनहिताचा लढा देण्यासाठी झालेला आहे. त्यामुळे तुम्ही संसदेत जनतेच्या प्रश्नावर ठामपणे भूमिका घ्या, सरकारला सळो की पळो करून सोडा, असे आदेश त्यांनी आपल्या खासदारांना दिले आहेत.






# देशात पहिल्यांदाच एकाच वेळी हृदय व मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वी

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ७ :

पिंपरीतील एका रुग्णावर एकाच वेळी हृदय आणि मूत्रपिंड प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. या प्रत्यारोपणामुळे रुग्णाला जीवदान मिळाले आहे. डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ही शस्त्रक्रिया झाली असून, अशा प्रकारे पहिल्यांदाच दोन्ही अवयवांचे प्रत्यारोपण एकत्रितपणे करण्यात आल्याचा दावा रुग्णालयाने केला आहे.

या रुग्णाचे वय ६० आहे. त्याने २००१ मध्ये दीर्घकालीन मूत्रपिंड विकारामुळे मूत्रपिंड प्रत्यारोपण करून घेतले होते. मात्र, २०२४ मध्ये त्याचे मूळ प्रत्यारोपित मूत्रपिंड निकामी झाले. त्याचबरोबर डायलेटेड कार्डिओमायोपथीमुळे त्याच्या हृदयाचे कार्यही




अत्यंत क्षीण झाले. डायलिसिस व अनेक औषधांवर अवलंबून असलेला हा रुग्ण डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाला. त्या वेळी त्याच्या सर्व चाचण्या करून त्याच्या प्रकृतीचे सखोल मूल्यमापन करण्यात आले. त्यानंतर त्याच्यावर एकाच वेळी हृदय व मूत्रपिंड प्रत्यारोपित करण्याचा निर्णय घेण्यात आला. एका अवयवदात्याचे हृदय व मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी १० जूनला मिळाले.

डॉक्टरांच्या पथकाने ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. मात्र, शस्त्रक्रियेनंतरचा काळ आव्हानात्मक होता. रुग्णावर दोन भिन्न अवयवांचे एकत्रित प्रत्यारोपण झाल्यानंतर, उपचारांचा पुढील टप्पा अत्यंत नाजूक आणि गुंतागुंतीचा होता. दोन्ही अवयवांची प्रतिकारशक्ती नियंत्रित ठेवण्यासाठी आवश्यक असलेले औषधोपचार वेगवेगळे असल्यामुळे उपचारांत अचूक समन्वय आणि वैद्यकीय दक्षता आवश्यक होती. वैद्यकीय पथकाने दररोज बैठकांचे आयोजन करून उपचारांची दिशा ठरवली. रुग्णाच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून उपचारात आवश्यक ते बदल तत्काळ केले गेले. आता या रुग्णाची प्रकृती स्थिर असून, तो बरा होत आहे. पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अँड रीसर्च सेंटरला अवयवदान आणि प्रत्यारोपण क्षेत्रातील योगदानाबद्दल सर्वोत्कृष्ट अवयव प्रत्यारोपण समन्वयक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. भारतीय अवयवदान दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे विश्वस्त व खजिनदार डॉ. यशराज पाटील यांनी हा सन्मान स्वीकारला. या वेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. एच. एच. चव्हाण आणि अवयवदान व प्रत्यारोपण विभागाच्या संचालिका डॉ. वृषाली पाटील उपस्थित होत्या.

## मतभेद ठिक, पण मनभेद नकोत

### आ. प्रविण दरेकरांचा पदाधिकाऱ्यांना सल्ला



**मुंबई** : पद काहीही असो, पण पक्ष संघटन मजबूत झाले पाहिजे. मतभेद असू शकतात, पण मनभेद नसावेत, असा स्पष्ट संदेश भाजपा विधान परिषद गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना दिला. त्याचबरोबर त्यांनी ठाकरे बंधूंवरही खरमरीत टीका करत, दारुगोळा भरून ठेवलाय, निवडणुकीत सगळं उघड करणार, असा सावध इशाराही दिला.बोरिवली (पूर्व) येथील पाटीदार समाज हॉलमध्ये मागाठाणे उत्तर आणि मध्य मंडळातील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या घोषणाप्रसंगी दरेकर बोलत होते. या कार्यक्रमात भाजपाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी, माजी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरेकर म्हणाले, मी कोणत्या पदावर आहे यापेक्षा त्या पदाला मी न्याय देतोय का हे महत्त्वाचं आहे. पद लहान-मोठं नसतं, माणूस कामाने मोठा होतो.

## महाबळेश्वरसाठी रोपवे प्रकल्पाची मागणी

### खासदार रविंद्र वायकर यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**मुंबई** : पर्यटनाची राजधानी म्हणून ओळखले जाणारे महाबळेश्वर सध्या वाढत्या वाहतूक कोंडी व प्रदूषणाच्या समस्येला सामोरे जात आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक उपाययोजना म्हणून पोलादपूर-महाबळेश्वर आणि वाई-पाचगणी-महाबळेश्वर दरम्यान रोपवे प्रकल्प सुरू करण्यात यावा, अशी ठोस मागणी खासदार रविंद्र वायकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. महाबळेश्वर हे राज्यातील तसेच देशातील एक महत्त्वाचे थंड हवेचे पर्यटनस्थळ असून दरवर्षी लाखो पर्यटक येथे गर्दी करतात. देशातील एकूण स्ट्रॉबेरी उत्पादनापैकी ८५% उत्पन्न येथून घेतले जाते. मात्र, वाढते वाहनभार, अरुंद आणि तीव्र वळणाचे घाटरस्ते, वाढती वाहतूककोंडी व प्रदूषण हे महाबळेश्वरच्या पर्यावरणासाठी गंभीर आव्हान ठरत आहे.

## कमी बोला, वादग्रस्त वक्तव्य टाळा

### एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मंत्र्यांना सूचना

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

विरोधकांना दरवेळी उत्तर देण्याची गरज नाही. कमी बोला आणि वादग्रस्त वक्तव्य टाळा, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कामाला लागा, असे आदेश देखील त्यांनी दिले आहेत. वादग्रस्त वक्तव्याने पक्षाचे नाव खराब होत असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. आता आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. या पार्श्वभूमीवर ग्राउंड झिरोवर उतरून कामाला लागा, अशा सूचना एकनाथ शिंदे यांनी आपल्या सर्व मंत्री आणि



आमदारांना दिल्या आहेत. विरोधकांच्या आरोपाला आपल्या कामातूनच उत्तर देण्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. यादरम्यान त्यांनी कालच गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देखील भेट घेतली. यासह आपल्या सर्व पक्षाच्या खासदारांची बैठक देखील एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. एकनाथ शिंदे यांच्या या दिल्ली दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संदर्भात भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत काही चर्चा झाली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यानंतरच सर्व मंत्री आणि आमदारांना या सूचना दिल्या गेल्या आहेत.

एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे लोकसभा निवडणुकीत नुकसान झाले असले तरी विधानसभा निवडणुकीत पक्षाला चांगले यश मिळाले आहे. मात्र, या दोन्ही निवडणुकीत भाजपचा चेहरा शिंदे यांच्या उमेदवारांसमोर होता. मात्र, आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाचा कस लागणार आहे. त्यामुळे शिंदे यांनी आपल्या सर्व आमदार आणि मंत्र्यांना कामाला लागण्याच्या सूचना केल्या आहेत.

## परराष्ट्र धोरण विदेश दौरे काढण्यापुरतेच आहे का?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :



आदित्य ठाकरेंचा मोदी सरकारवर निशाणा

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणावरुन नरेंद्र मोदी सरकारवर टीका केली आहे. तारीफ पासून टॅरिफ पर्यंतचा प्रवास आता 50% पर्यंत पोहोचला असल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. या यामाध्यमातून त्यांनी देशाच्या परराष्ट्र निती वर बोट ठेवले आहे. या संदर्भातील ठाकरे यांनी सोशल मीडियावरील पोस्टच्या माध्यमातून नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणातील नितीवर टीका केली आहे. यामध्ये त्यांनी बांगलादेश आणि पाकिस्तान सोबत होत असलेल्या क्रिकेट सामन्यांवरून देखील सरकारवर टीका केली. इतकाच नाही तर आधी चिनी वस्तूवर बहिष्कार टाकण्याची मागणी करणारे नरेंद्र मोदी देखील आता चीनला जात आहेत. यावरून देखील आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. सध्या उद्योग आणि लघुउद्योग अडचणीत आहेत. मात्र केंद्र सरकारमधील कोणताही मंत्री या विषयावर बोलत नाही. व्यापार करारावर कोणतीच स्पष्टता नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

## दोन गटांत झालेल्या हाणामारीत ४ जण जखमी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

बोरिवलीत दोन गटांत झालेल्या हाणामारीत ४ जण जखमी झाले आहेत. बुधवारी सकाळी ही घटना घडली. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू असून दोन्ही गटातील लोकांवर एमएचबी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बोरीवली पश्चिमेकडे एमएचबी पोलीस ठाणे आहे. या पोलीस ठाण्याला लागून शिववडा नावाची वडापाव विक्रीची गाडी आहे. यादव नावाचे कुटुंबिय ही वडापाव विक्रीची गाडी चालवतात. त्यांच्याकडे पवन दुबे नावाचा एक कर्मचारी काम करत होता. काही दिवसांपूर्वी या दुबेच्या परिचयातील महिलेचे छायाचित्र फेसबुकवर टाकण्यात आले होते. त्याबद्दल मागील आठवड्यात दुबे याने येऊन जाब विचारला होता. त्यानंतर फेसबुकवरून ते छायाचित्र हटविण्यात आले होते. सोमवारी या मुद्द्यावरून पुन्हा यादव आणि दुबे यांच्यात वाद झाला होता.

## बंजारा लमाण तांड्यांना महसुली ग्रामपंचायतचा दर्जा देणार : जयकुमार गोरे



**मुंबई** : राज्यातील विविध महसूल विभागात लोकसंख्येच्या निकषावर पात्र असलेल्या बंजारा लमाण तांड्यांना महसुली ग्रामपंचायतचा दर्जा देण्याचा प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. याबाबत अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नाशिक विभागीय आयुक्तांना थेट दूरध्वनी द्वारे सूचना दिल्या. संत सेवालाल बंजारा/ लमाण तांडा समृद्धी योजनाबाबत मंत्री गोरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी ग्रामविकास विभागाचे सहसचिव वी श.बोंदरे, बंजारा/ लमाण तांडा समृद्धी योजनेच्या राज्यस्तरीय समितीचे अशासकीय सदस्य महंत जितेंद्र महाराज, श्रावण चव्हाण तसेच समाज संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. विविध महसुली विभागामध्ये याबाबत जिल्हा अथवा पंचायत समिती स्तरावर प्रलंबित आहेत. महसुली गावाचा दर्जा देण्याचे अधिकार विभागीय पातळीवर दिलेले आहेत. शासनाने तांडांच्या विकासासाठी यापूर्वी दिलेल्या 139 कोटी रुपये निधीतील झालेल्या कामांच्या खर्चाचा आढावा घेतला जाईल. प्रत्येक तांड्यावर स्मशानभूमी व सभागृह उभारण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार असून महसुली गावाचा दर्जा देण्यासाठी पात्र असलेल्या तांड्यांच्या प्रस्तावांना मान्यता देताना कोणतेही तडजोड केली जाऊ नये. बैठकीमध्ये समाजाच्या विविध मागण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पुनर्विकासाचा आराखडा तयार करा : योगेश कदम



**मुंबई** : रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे आंबडवे (ता. मंडणगड) येथे असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वसमावेशक असा आराखडा तयार करावा, अशा सूचना गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण आणि अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिल्या. मौजे आंबडवे येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या विकास संदर्भात राज्यमंत्री श्री. कदम यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात त्यांच्या समिती कक्षात बैठक झाली. बैठकीस रत्नागिरी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, दापोलीचे उपविभागीय अधिकारी डॉ. विजयकुमार सूर्यवंशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहसचिव सो. ना. बागुल यांच्यासह रत्नागिरी जिल्हा समाजकल्याण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री श्री. कदम म्हणाले, मौजे आंबडवे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे स्मारक सामाजिक, ऐतिहासिक आणि प्रेरणादायी वारसा आहे. या स्मारकाचा विस्तार व पुनर्विकास करताना स्मारक परिसरातील काही घरांचे व कुटुंबांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे.

## वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरीची नवी मूळ दस्तऐवजी मालिका

### एक होता राजा अकुल त्रिपाठींसह प्रदर्शित होणार

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :

वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी भारतातील एक नवीन मूळ डॉक्युसीरीज एक होता राजा - अकुल त्रिपाठींसोबत सादर करण्यासाठी सज्ज आहे। ही मालिका ७ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ९ वाजता डिस्कवरी चॅनेल आणि डिस्कवरी प्लस वर विशेषतः प्रीमियर होणार आहे। गंभीर ऐतिहासिक घटनांची समृद्ध मांडणी आणि प्रभावी कथाकथन यांचा संगम असलेल्या या मालिकेत भारताच्या सुप्रसिद्ध तसेच अल्पपरिचित राजे-राण्यांच्या शौर्य आणि संघर्षमय जीवनाचा आढावा घेतला आहे। यामध्ये अप्रतिम गनिमी काव्याचे तज्ज्ञ, सागरी योद्धे आणि साम्राज्य उभारणारे शासक यांच्या कथा समाविष्ट आहेत।

ही आठ भागांची मालिका प्रेक्षकांना विविध शतकांमधून आणि भूगोलांमधून प्रवास घडवते। गढवाल (उत्तराखंड), मालवा (पश्चिम मध्य प्रदेश), राजपुताना (राजस्थान), दख्खन (महाराष्ट्र व तेलंगणा), कर्नाटका आणि काश्मीर - या प्रत्येक भागातून अशा राजांचे चित्रण होते ज्यांचे शौर्य इतिहास घडवणारे ठरले। भारतासह दक्षिण आशियाई प्रवासी समाजालाही ही मालिका सहजपणे समजावी यासाठी ती इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड आणि बंगाली, या सात भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

एक होता राजा ही मालिका अकुल त्रिपाठी सादर करतात, ते एक उत्कट कथाकथनकार, सांस्कृतिक अभ्यासक आणि भारतातील ऐतिहासिक कथाविषयक भाष्य करणाऱ्या सर्वाधिक सन्माननीय व्यक्तींमध्ये गणले जातात.

ही मालिका अशा थोर शासक आणि नेत्यांच्या जीवनाचे चित्रण करते, ज्यांची परंपरा आणि कर्तृत्व मुख्य प्रवाहातील इतिहासाच्या पलीकडे जाऊन आजही जिवंत आहे। त्यामध्ये गोंडवाणाची राणी दुर्गावती यांचा समावेश आहे, ज्या मुघलांविरुद्ध लढताना आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी वीरमरण पावल्या; किनारपट्टी कर्नाटकमधील ज्वालामुखी स्वभावाची राणी अब्बक्का चौटा, ज्या पोतुर्गीज वसाहतवाद्यांना निर्भयपणे आव्हान देत राहिल्या; आणि काश्मीरचे ललितादित्य मुक्तपीड, जेथे त्यांनी त्या भागातील सर्वात भव्य साम्राज्यांची उभारणी केली। या मालिकेत महाराणा प्रताप आणि राणा सांगा (राजस्थान), पेशवा बाजीराव प्रथम (महाराष्ट्र), राजा छत्रसाल (बुंदेलखंड), आणि राणी कर्णावती (गढवाल) यांचाही समावेश आहे. या मालिकेच्या प्रारंभाविषयी भाष्य करताना, वॉर्नर ब्रदर्स डिस्कवरी - दक्षिण आशिया विभागाचे वास्तववादी करमणूक, जीवनशैली आणि बालकार्यक्रम प्रमुख साई अभिषेक म्हणालेः "एक ब्रँड म्हणून, आम्ही सदैव परिणामकारक कथांचे समर्थन करत आलो आहोत.

## महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्या परीक्षेचे पेपर फुटले

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ७ :

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता ३री ते ९वीच्या परीक्षेचे पेपर आणि त्यांची उत्तरे खासगी युट्युब चॅनेलवर प्रसारित केल्याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात 'कैलासन सर मॅथ्स', 'म मराठी' आणि 'एस.जे. ट्युशन क्लासेस' या तीन खासगी युट्युब चॅनेलची नावे समोर आली आहेत. या चॅनेलवर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची कोणतीही परवानगी न घेता परीक्षेचे पेपर प्रसारित करण्यात आले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या सहायक संचालक संगिता प्रभाकर शिंदे (५०, रा. हडपसर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ६ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी साडेबारा वाजता निदर्शनास आला. तक्रारदार संगिता शिंदे यांच्या तक्रारीनुसार, राज्य शासनाने २०२१ पासून इयत्ता ३री ते ९वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा मराठी, गणित व तृतीय भाषा इंग्रजी या विषयांची नियतकालिक मूल्यांकन चाचणी सुरू केली आहे. २०२३ पासून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय व अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पायाभूत चाचणी घेण्यात येते.

## चीनमधून निकृष्ट बेदाण्यांची आयात

### जयंत पाटील यांची दिलासा देण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, सांगली, दि. ७ :



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा आमदार जयंत पाटील यांनी चीनमधून आयात होणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या बेदाण्याच्या मुद्यावरून महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. चीनच्या निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यांमुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी व देशाच्या परकीय गंगाजळीचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे सरकारने या बेदाण्यांची विक्री थांबवून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, असे ते म्हणालेत.

जयंत पाटील म्हणाले, चीनमधून होणारी बेदाण्यांची बेकायदा आयात त्वरित थांबवण्यात यावी यासाठी काल माज्या सांगली जिल्ह्यातील द्राक्ष व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला होता. खरंतर ही बाब मी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने सरकारच्या निदर्शनास आणून दिली होती. मात्र त्यावर काहीच निर्णय घेतला गेला नाही. त्यामुळे सरकार या विषयावर गंभीर आहे की नाही असा प्रश्न आम्हाला पडतो आहे.?

लहरीपणामुळे यंदाच्या द्राक्ष हंगामात उत्पादनात मोठी घट झाली. परिणामी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या हंगामात बेदाणा उत्पादन घटले आहे.? त्यात चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची मोठ्या प्रमाणावर आयात होत आहे.

हा द्राक्ष बागायतदार शेतकरी जगला पाहिजे या उद्देशाने त्यांनी पिकविलेल्या बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करुन द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचे मजबुतीकरण करावे अशी मागणी आम्ही लावून धरतोय. एकिकडे अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.

# महावितरणच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत पुण्याचे डॉक्टर, तुम्ही सुद्धा! सर्वोत्कृष्ट

## नागपूरचे रंगबावरी नाट्यकृती द्वितीय

■ महासागर प्रतिनिधी नाशिक, दि. ७ :

महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरप्रादेशिक नाट्यस्पर्धेत पुणे प्रादेशिक विभागाच्या संघाने डॉक्टर, तुम्ही सुद्धा या नाटकाचे सर्वोत्कृष्ट सादरीकरण करीत प्रथम क्रमांकाचा करंडक पटकाविला. तर नागपूर प्रादेशिक विभागाचे रंगबावरी या नाटकाला द्वितीय क्रमांकाचा मान मिळाला.

येथील महाकवी कालिदास कलामंदिरात महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरप्रादेशिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. अतिशय दर्जेदार व विविध विषयांचा वेध घेत घेणाऱ्या चारही प्रादेशिक विभागाच्या नाट्यकृतींना नाशिककर रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला. या नाट्यस्पर्धेतील सांघिक, वैयक्तिक विजेते व उपविजेत्यांचे महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र व संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी अभिनंदन केले.

दोन दिवसीय राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचा (दि. ६ ) समारोप झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण प्रादेशिक विभागाचे सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) अरविंद भादीकर, मुख्य तपास




अधिकारी दत्तात्रय बनसोडे, नाट्यस्पर्धेचे निमंत्रक व मुख्य अभियंता सुंदर लटपटे, मुख्य अभियंते हरिष गजबे (चंद्रपूर), चंद्रमणी मिश्रा (कल्याण), संजय पाटील (भांडुप), पवनकुमार कछोट (छत्रपती संभाजीनगर), नाट्यस्पर्धेचे मुख्य समन्वयक व मुख्य औद्योगीक संबंध अधिकारी संजय ढोके यांची उपस्थिती होती. या पाहुण्यांच्या हस्ते नाट्यस्पर्धेतील विजेत्या संघांना करंडक तसेच वैयक्तिक गटातील विजेत्यांना स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. नाट्यस्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रभाकर दुपारे, चंद्रकांत जाडकर, मीनाक्षी केंढे यांनी काम पाहिले. सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे म्हणाले, महावितरणच्या कामाचे स्वरूप पाहता नाट्यकर्मी कर्मचाऱ्यांना खूप कमी वेळ मिळतो. तरी देखील अथक परिश्रम घेत नाट्य कलावंतानी अतिशय दर्जेदार कलाकृती सादर केल्या आहेत. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना नवऊर्जा देणारी ही नाट्यस्पर्धा आहे असे त्यांनी सांगितले.

बक्षिस वितरण कार्यक्रमाला महावितरणचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते, अधिकारी, कर्मचारी व नाट्यरसिक बहुसंख्येने उपस्थित होते. संचालन जनसंपर्क अधिकारी विकास आढे व रंगकर्मी संदीप पाचंगे यांनी केले. या नाट्यस्पर्धेत कोकण प्रादेशिक विभागाने आवर्त, पुणे प्रादेशिक विभागाने डॉक्टर तुम्ही सुद्धा, नागपूर प्रादेशिक विभागाने रंगबावरी आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाने केस नं. ९९ नाट्यप्रयोग सादर केले.

**पारितोषिक वितरण सोहळ्याचे राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे**


सर्वोत्कृष्ट नाटक : प्रथम- डॉक्टर, तुम्ही सुद्धा! (पुणे), द्वितीय- रंगबावरी (नागपूर) दिग्दर्शन : प्रथम - ज्ञानदेव पडळकर (पुणे), द्वितीय - संध्या चिवंडे (नागपूर) अभिनय (पुरुष) : प्रथम - विजय जोशी (पुणे), द्वितीय - श्रावण कोळनुरकर (छत्रपती संभाजीनगर) अभिनय (स्त्री) : प्रथम - रोहिणी ठाकरे(नागपूर), द्वितीय - भक्ति जोशी(पुणे) नेपथ्य : प्रथम- सतीश सरोदे (पुणे), द्वितीय - राम मेस्त्री (कोकण) प्रकाशयोजना : प्रथम - अभय येरडे(छत्रपती संभाजीनगर), द्वितीय - अभिजीत सिकनिस (कोकण) संगीत : प्रथम - रुपेश देशमुख(नागपूर), द्वितीय - अनिल राजपूत(छत्रपती संभाजीनगर) रंगभूषा व वेशभूषा : प्रथम - विकास पुरी (पुणे), द्वितीय - प्रशांत ठाकरे (नागपूर) उत्तेजनार्थ (अभिनय) : श्रद्धा मुळे (कोकण), सचिन निकम (पुणे), सायली सायनकर (नागपूर) आणि रमेश शिंदे (छत्रपती संभाजीनगर) यांना सन्मानित करण्यात आले.

# पंतप्रधान मोदींनी भारताला निराश केले : प्रकाश आंबेडकर

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :

अमेरिकेने भारतावर लादलेल्या 50 टक्के टॅरिफच्या मुद्यावरून वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. पंतप्रधान मोदींनी भारताला निराश केले. त्यांच्यामुळेच अमेरिकेने भारतावर आपली इच्छा थोपली, असे ते म्हणालेत.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर 50 टक्के टॅरिफ लादण्याच्या घोषणा केली आहे. एवढेच नाही तर इतरही अनेक अतिरिक्त दंड लावण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे भारतीय उद्योग जगतात



एकच खळबळ माजली आहे. विरोधकांनी या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकेची झोड उठली असताना प्रकाश आंबेडकर यांनी उपरोक्त टीका केली आहे.

प्रकाश आंबेडकर गुरूवारी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला निराश केले आहे. अमेरिकेने भारतावर 50 टक्के कर लादला. हा कर इतर सर्वच देशांच्या तुलनेत आतापर्यंतचा सर्वात जास्त आहे. भारत कधीही अशा आर्थिक दबावापुढे झुकला नाही. कधी झुकणारही नाही. उलट तो नेहमीच आपल्या राष्ट्रीय हितासाठी ठामपणे उभा राहिला असून, यापुढेही राहील.

भारताने विसरू नये की, मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनांशी संबंधित एचएसएस व अमेरिकेतील इतर हिंदुत्ववादी संघटनांनी 2016, 2020 व 2024 च्या अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीत अमेरिकेतील भारतीय वंशाच्या लोकांना डोनाल्ड ट्रम्प यांना मतदान करण्याचे आवाहन केले होते.

## पृथ्वीराज चव्हाण यांना १० कोटींची मानहानीची नोटीस

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :

माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आतंकवादासाठी भगवा शब्द वापरू नये, त्याऐवजी सनातनी आतंकवाद म्हणा, असे विधान केले होते. यानंतर त्यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात आली. सनातन संस्थेला दहशतवादी संबोधल्याने सनातन संस्थेने पृथ्वीराज चव्हाण यांना दहा कोटी रुपयांची मानहानीची नोटीस पाठवली आहे. बिनशर्त माफी मागण्याचीही मागणी केली. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सात आरोपींची एनआयएच्या विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. यानंतर काँग्रेसने भगवा दहशतवाद म्हणत हिंदूंना बदनाम करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला होता.

# रामनगर म्हाडा कॉलनीत ‘साळीदर पक्षा’चा थरारक प्रवेश!

**अकोला :** शहरातील रामनगर म्हाडा कॉलनी परिसरात आज रात्री ८ वाजता 'साळींदर' (इंग्रजीत: झैलीप्रिंश) हा दुर्मिळ काटेधारी वन्य प्राणी आढळून आला असून, त्यामुळे परिसरात काही काळ खळबळ निर्माण झाली. हा दुर्मिळ प्राणी प्रथम सुमित पुरी यांना त्यांचा कुत्रा फिरवताना काही नागरिकांनी दाखवला. त्यानंतर त्यांनी आपला कुत्रा घरी नेला व तातडीने त्या प्राण्याच्या मागावर गेले. ही माहिती मिळताच वनविभागाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली व प्राणी पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र अंधाराचा फायदा घेत साळींदर सुळसुळीत निसटून गेला.



'साळींदर' सामान्यतः जंगलामध्ये आढळतो. त्याच्या अंगावर असलेले तीव्र काटे त्याच्या सुरक्षेसाठी कवचासारखे कार्य करतात, त्यामुळे तो सहजासहजी कोणालाही जेरबंद होत नाही. हा प्राणी मानवास अपाय करत नाही, मात्र तो स्वतःच्या संरक्षणासाठी आक्रमक होऊ शकतो. वनविभागाने परिसरात सतत नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांनी अशा दुर्मिळ प्राण्यांची माहिती मिळाल्यास घाबरून न जाता तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी कृत्रिम वाळू धोरण :जिल्हाधिकारी

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**

नद्यांच्या पर्यावरणीय समतोलासाठी राज्य शासनाने नैसर्गिक वाळूला पर्याय म्हणून कृत्रिम वाळूचा ( एम - सँड) पर्याय उपलब्ध करून दिला आहे. जिल्हा प्रशासनाने कृत्रिम वाळूचे उत्पादन वाढविण्यासाठी पुढाकार घेतला जात असून कृत्रिम वाळू उद्योगांचा विकास होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे केले.महसूल सप्ताह समारोपानिमित्त नियोजनभवनात आयोजित कृत्रिम वाळू धोरण कार्यशाळेत बोलत होते. प्र. अपर जिल्हाधिकारी महेश परांडेकर,उपजिल्हाधिकारी निखील खेमनार, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी महेश भिवापूरकर,जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे ,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा उपसंचालक श्री कराळे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी



अनिल चिंचोले, तहसीलदार सुरेश कव्हळे, सी.ए पंकज अग्रवाल आदी उपस्थित होते.यावेळी श्री. कुंभार म्हणाले की, कृत्रिम वाळू धोरणाचे मुख्य उद्दिष्ट नैसर्गिक वाळूवरील अवलंबन कमी करणे,पर्यावरणाचे संवर्धन करणे, आणि बांधकाम क्षेत्राला योग्य दरात दर्जेदार वाळू उपलब्ध करून देणे आहे. त्यामुळे अधिकाधिक खाणपट्टाधारकांनी यामध्ये सहभागी व्हावे.कृत्रिम वाळूचे उत्पादन करणाऱ्या पहिल्या ५० उद्योजकांना जिल्हा प्रशासनाकडून सवलती देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन केले.जिल्ह्यातील खाणपट्टा धारक, संबंधित यंत्रणांचे अधिकारी कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

## हृदय रोगाचा झटका येऊन तरुणांचा मृत्यू !

**वाडेगांव,दि ६ (प्रतिनिधी) :**

येथील गजानन समाधान टिकार वय ३५ वर्षे वयाचा असतांना त्याला सकाळी सकाळी छातीत कळा निघत असतांना त्याचा अचानक मृत्यू झाला . बँकेची आर. डी. लोकाकडून जमा करण्याचा त्याचा व्यवसाय होता. त्याचे मुळगांव कोल्हरी आहे पण कामधंद्या निमित्त त्याचे आई बाबा मुला बाळासह गेल्या तीस वर्षापासून वाडेगांवात वास्तव्यास होते.गजानन हा इमानदार निर्व्यसनी तरुण होता त्याचे मागे बराच आप्त परिवार असुन त्याच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# तो तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**

शहरात 'द अशोक फार्मा' या होलसेल औषध विक्रीच्या दुकानाचे मालक असलेल्या एकाच कुटुंबातील तीन आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी अनेक लोकांना चांगल्या परताव्याचं आमिष दाखवून लाखो रुपयांची गुंतवणूक करून घेतली आणि नंतर पैसे परत करण्यास टाळाटाळ केली. तक्रारदारानुसार, आरोपी आता देश सोडून पळून जाण्याच्या तयारीत आहेत. हिमेश महेश शाह,भावीन महेश शाह,हेतल हिमेश शाह हे प्रमुख आरोपी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या तिघांनी संगनमताने अनेक लोकांकडून कोट्यवधी रुपये गोळा केले. एका मेडिकल प्रतिनिधीच्या तक्रारीवरून हे प्रकरण समोर आलं.

सुरुवातीला आरोपींनी काही रक्कम ऑनलाइन परत केली, पण नंतर त्यांनी पैसे देणं बंद केलं. पैसे परत मागितले असता आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली. एका आरोपीच्या कुटुंबातील महिलेने अहम दाबादमधील विमान अपघातात सासू–सासरे मरण पावल्याने मिळणारी कोट्यवधींची मदत मि ळाल्यानंतर पैसे परत करू, असं आश्वासन दिलं होतं. मात्र, आता शाह कुटुंब कोणाचेही फोन घेत नाही आणि ते अकोल्यातून निघून गेल्याची माहिती मिळाली आहे. या गंभीर प्रकरणाचा तपास आता पोलीस निरीक्षक दीपक गोळे यांच्या नेतृत्वाखाली आर्थिक गुन्हे शाखा करत आहे. या प्रकरणात फसवणूक झालेल्या लोकांची संख्या आणि रकमेचा आकडा वाढत असल्याचं बोललं जात आहे. आरोपींना वेळीच थांबवणं गरजेचं आहे, असं तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे.

## उत्तरकाशी ढगफुटी: अकोल्याच्या यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी युद्धपातळीवर प्रयत्न

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**

उत्तरकाशी (उत्तराखंड) येथे आलेल्या ढगफ टीमुळे भीषण नैसर्गिक आपत्ती उद्भवली असून, मंदाकिनी नदीला आलेल्या पुरामुळे अनेक इमारती कोसळल्या आणि व्यापक नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर चारधाम यात्रेसाठी गेलेल्या अकोला आणि विदर्भातील यात्रेकरूंच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. या घटनेनंतर अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी तत्काळ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्याशी संपर्क साधून अकोला आणि विदर्भातील अडकलेल्या यात्रेकरूंबाबत माहिती घेतली व त्यांच्यासाठी तातडीची मदत पोहोचविण्याची मागणी केली. तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांनी अकोला व बुलडाणा जिल्ह्यातील यात्रेकरूंच्या नातेवाइकांशी संपर्क साधण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. अडकलेल्या नागरिकांची यादी तयार करून त्यांच्याशी थेट संपर्क साधण्याचे आणि त्यांना सर्वतोपरी मदत पुरवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, अकोला जिल्ह्यातील वांगेश्वर देवस्थान (ता. तेल्हारा) यांचा मठ उत्तरकाशी येथे आहे.

# पशुसंवर्धन विभागाच्या सचिवांनी केली नवीन इमारतीची पाहणी

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसीकडून) अकोल्यातील महाराष्ट्र पशुसंवर्धन आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाची इमारत बांधत आहे. नुकतीच पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी यांनी या बांधकामस्थळाला भेट देऊन कामाची पाहणी केली. इमारतीचे बांधकाम उत्तम दर्जाचे होत असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.एमएसआयडीसीचे अधीक्षक अभियंता प्रशांत पगारुत यांनी सचिवांचे स्वागत केले आणि त्यांना बांधकामाची सविस्तर माहिती दिली.

या भेटीदरम्यान, डॉ. रामास्वामी यांनी पशुसंवर्धन क्षेत्रातील प्रगतीवर भर दिला. ते म्हणाले, पशुसंवर्धन क्षेत्रात विकासाचे नवे टप्पे गाठण्यासाठी भरपूर संसाधने उपलब्ध



आहेत. आधुनिक बांधकाम करण्याची माझी इच्छा होती, ती आज पूर्ण होताना दिसत आहे. एमएसआयडीसीकडून द्वारे होत असलेल्या या दर्जेदार बांधकामामुळे विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळतील.हा प्रकल्प एकूण १०५ एकर परिसरात सुरू असून, एमएसआयडीसीकडून येथे विविध प्रकारची बांधकामे करत आहे. ५० हजार १७८ चौरस मीटर क्षेत्रात होणाऱ्या या बांधकामांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण इमारतींचा समावेश आहे.शैक्षणिक आणि प्रशासकीय इमारती : प्रशासकीय इमारत, महाविद्यालय, ग्रंथालय इमारत, परीक्षा हॉल, सभागृह. निवास व्यवस्था : दोन वसतिगृहे (मुले आणि मुलींसाठी), अध्यक्षीय निवासस्थान, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी विविध प्रकारची निवासस्थाने, निवासी डॉक्टर निवासस्थान आणि अतिथीगृह आहे.

# जिल्ह्यातील २८ हजारांवर लाभार्थ्यांची तपासणी

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त लाभार्थी असलेल्या २८ हजार ८७५ लाभार्थ्यांची सेविकांकडून गृहभेटीव्दारे तपासणी करण्यात येत आहे.महायुती शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यात दरमहा १ हजार ५०० रुपये जमा करण्यात येत आहेत. लाडकी बहीण योजनेंतर्गत एका कुटुंबातील कुटुंबप्रमुख महिला व अविवाहित मुलगी अशा दोन लाभार्थी महिलांना लाभ घेता येतो; मात्र एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त लाभार्थी असलेल्या जिल्ह्यातील २८ हजार ८७५ महिला लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे अंगणवाडी सेविकांमार्फत अशा लाभार्थ्यांच्या गृहभेटी करून तपासणी सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी दिली. या सोबतच योजनेंतर्गत २१ वर्षांपेक्षा कमी आणि ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या जिल्ह्यातील ६ हजार १२५ महिला लाभार्थ्यांचीही तपासणी सुरू करण्यात आल्याचे पुसदकर यांनी सांगितले.

## थोडक्यात

### ब्रेक के बाद अतिक्रमण हटाव मोहीम पुन्हा प्रारंभ

**अकोट :** अकोट पालिकेने शहरात बुधवारपासून अतिक्रमण हटाव मोहिमेस पुन्हा सुरू केली आहे. त्यामुळे अतिक्रमणधारकांमध्ये पुन्हा वातावरण निर्माण झाले आहे. धास्तीचे अकोट पालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. नरेंद्र बेंबरे यांनी अकोट शहरातील मुख्य रस्त्यांसह ज्या रस्त्यांवर अतिक्रमणामुळे वाहतुकीस खोळंबा होऊन नागरिकांना त्रास होतो त्या रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्याचा सपाटा सुरू केला आहे. गत १५ दिवसापासून अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्यात आली. सुरुवातीला सलग ५ दिवस चाललेल्या या मोहिमेमुळे रस्ते मोकळे व प्रशस्त दिसू लागले आहेत. दरम्यान गेल्या ८ दिवसांपूर्वी अतिक्रमण हटाव मोहीम बंद करण्यात आली होती. त्यामुळे अनेकांना ही मोहिम बंद पडली असे वाटू लागले होते. परंतु बुधवारी अचानक नगरपालिका व पोलिस विभाग यांच्या संयुक्तपणे अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली. या मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी चौक तसेच हिवरखेड रोड, अकोला रोड, आठवडी बाजारातील उर्वरित अतिक्रमण असे विविध ठिकाणचे अतिक्रमण काढण्यात आले. अतिक्रमण हटाव मोहीम सुरू असताना नव्यानेच रूजू झालेले उपविभागीय पोलिस अधिकारी निखिल पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली. अतिक्रमण काढताना अकोट शहरचे ठाणेदार अमोल मवळे मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे हे स्वतः हजर राहून लक्ष ठेऊन होते, या मोहिमेत नगर अभियंता अभिषेक गोतरकर, उपअभियंता दिनेश ठेलकर, उपअभियंता शिवाणी ठाकरे, नगर रचना अधिकारी अस्मिता पाटील, बांधकाम कर्मचारी किशोर तेलगोटे व पोलिस कर्मचारी, न.प. चे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कुत्र्यांपासून दिलासा!

**पातूर :** शहरातील वाढत्या मोकाट कुत्र्यांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. शहरातील रस्त्यांवर सकाळ–संध्याकाळ फिरणाऱ्या शाळकरी मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनाच मोकाट कुत्र्यांचा धोका होता. या वाढत्या तक्रारींची दखल घेऊन अखेर नगरपालिकेने मोकाट कुत्रे पकडण्याची मोहीम सुरू केली आहे.गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली होती. केवळ माणसांनाच नाही तर पाळीव प्राण्यांनाही या कुत्र्यांनी लक्ष्य केले होते. काही दिवसांपूर्वी एका बकरीवरही हल्ला झाल्याची घटना घडली होती. या घटनांमुळे नागरिकांमध्ये रात्री–अपरात्री बाहेर पडण्याची भीती निर्माण झाली होती. मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडणारे नागरिक, तसेच शाळेत जाणारी मुले आणि कामावर जाणारे लोक यामुळे भयभीत झालेहोते. नागरिकांच्या वाढत्या तक्रारी होत्या.

## बळीराजासह नागरिकांना पावसाची प्रतीक्षा

### पाण्याऐवजी बरसत आहेत घामाच्या धारा

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**

तसे पाहिले तर ऑगस्ट महिना हा पावसाचा ओळखला जातो, परंतु ऑगस्ट महिना सुरू होऊन आठ दिवस उलटल्यानंतरही पावसाने दडी मारली आहे, सध्या आकाश निरभ्र दिसत असून पावसाचे नामोनिशान ही दिसून येत नाही, भीषण गर्मी आणि उन्हाच्या कडाक्याने नागरिक परेशान झाले आहेत, श्रावण महिन्यातील रिमझिम पावसांच्या धाराऐवजी नागरिकांना घामाच्या धारांचा सामना करावा लागत आहे, शहरातील तापमान ३५ डिग्रीहून अधिक पोहोचले आहे हवामान विभागाने ऑगस्ट महिन्यात नेहमीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता वर्तवली आहे, बंगालच्या खाडीत तसेच अरबी समुद्रात दबावाचे क्षेत्र निर्माण होत नसल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे,



सध्या शेतकऱ्यांची पिके वाऱ्यावर चांगली डोलत आहेत, पिकांना डवरे व निंदणाचे फेर झाले आहेत, परंतु त्यांना पावसाची नितांत आवश्यकता आहे, जिल्ह्यात काही ठिकाणी थोड्या बहुत प्रमाणात पाऊस होण्याची शक्यता आहे, परंतु ऑगस्ट महिन्यात ज्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात पाऊस येतो त्याप्रमाणे यंदा पाऊस पडण्याची चिन्हे दिसून येत नाहीत, आगामी सात विदर्भातील दिवसांपर्यंत वातावरण असेच राहणार आहे त्यामुळे पावसाची प्रतीक्षा करणेच शेतकऱ्यांचा

# पातूरच्या किड्स पॅराडाईज मध्ये रक्षाबंधन उत्साहात

## ब्रम्हकुमारी विश्‍व विद्यालयाचा अभिनव उपक्रम

**पातुर,दि ६ (प्रतिनिधी) :**

येथील ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या वतीने किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल येथे रक्षाबंधन उत्साहात पार पडले. प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय पातूरच्या वतीने रक्षाबंधन उपक्रमाचा शुभारंभ किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल येथून करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रजापीता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय पातूरच्या संचालिका ब्रह्मलीन राजयोगिनी लीनादीदी ह्या होत्या.तर विशेष अतिथी म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक जनार्दन ढोकणे हे होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे, कार्यकारी



संचालिका सौ ज्योत्स्ना गाडगे, बी. के. माधुरी उगले दीदी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक मधून जनार्दन ढोकणे यांनी कार्यक्रमाचा उद्देश विषद केला. तर प्रमुख उपस्थित गोपाल गाडगे यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा लीना दीदी यांनी रक्षाबंधन या उपक्रमाची सामाजिक भावना मांडली. यावेळी उपस्थित शिक्षक व कर्मचारी वृंदाना राख्या बांधून सामाजिक दायित्व याची जाणीव करून दिली. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे यांनी तर आभार नितु ढोणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, नरेंद्र बोरकर, नितु ढोणे, संकल्प व्यवहारे, हरिष सौंदळे, बजरंग भुजबराव, अविनाश पाटील, अक्षय तायडे, प्रतीक्षा भारसाकळे, प्रियंका चव्हाण उपस्थित होते.

# रविवार पासून धावणार ‘वंदे भारत एक्सप्रेस’

## सिटिंग व्यवस्था असलेली रेल्वे अकोल्यात थांबणार

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**

पुणे–नागपूर दरम्यान वंदे भारत एक्सप्रेस' धावणार आहे. रेल्वे मंत्रालयाच्या रेल्वे बोर्डाने या नवीन सेवेला मंजुरी दिली आहे. वंदे भारत एक्सप्रेस ही पुणे–नागपूर आणि नागपूर–पुणे या मार्गावर आठवड्यातून सहा दिवस धावेल. या गाडीला आता अकोल्यात थांबा मंजुर करण्यात आला आहे.

खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. पुणे–नागपूर वंदे भारत एक्सप्रेसचे पुण्यातून सकाळी ९.५० ला सुटेल. ती गाडी, मनमाड, भुसावळ अकोल्यात मार्गे ५.२५ वाजता पोहचेल. हीच गाडी नागपूर ला सव्वा नऊ ला



पोहचणार आहे. तरनागपूर–पुणे वंदे भारत एक्सप्रेस सकाळी सव्वा सहा वाजता नागपूर येथून निघून अकोल्याला सकाळी ९:५३ ला पोहचेल. पुण्यात ती गाडी दुपारी साडेचार वाजता पोहचणार आहे. वंदे भारत एक्सप्रेसची ही सेवा सेवा आठवड्यातून सहा दिवस असेल. अजनी (नागपूर)–पुणे वंदे भारत एक्सप्रेस सोमवार वगळता इतर सर्व दिवशी धावेल, तर पुणे–नागपूर वंदे भारत वंदे भारत एक्सप्रेस मंगळवार वगळता इतर सर्व दिवशी धावेल. या सेवेसाठी वंदे भारत एक्सप्रेसचे दोन रॅक उपलब्ध असतील. प्रवाशांच्या सोयीसाठी आणि तात्काळ गरजेनुसार ही सेवा लवकरच सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या गाडीला अकोला, वर्धा, बडनेरा, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव आणि अहमदनगर येथे थांबा असणार आहे. ही सेवा लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे.

## डॉ पूजा खेतान केंद्रीय मानवाधिकार संघटनच्या प्रदेश सचिवपदी

**अकोला :**



राष्ट्रीय स्तरावर मानव अधिकाराचे रक्षण करणाऱ्या केंद्रीय मानव अधिकार संघटनच्या प्रदेश सचिव पदी डॉ पूजा रमाकांत खेतान यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली.केंद्रीय मानवाधिकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मिलिंद दहीवले यानी डॉ पूजा खेतान यांच्या सामाजिक व वैद्यकीय सेवेचा झंझावात बघता त्यांना हे पद बहाल केले.नागपूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या केंद्रीय मानवाधिकार संघटनच्या कार्यकारणी बैठकीत डॉ पूजा खेतान यांची नियुक्ती करण्यात आली. हे नियुक्तीचे पत्र व बॅच संघटनेचे राष्ट्रीय सचिव डॉ महेंद्र खंडेडीया यांनी डॉ पूजा खेतान यांच्या कार्यालयात भेट देऊन तेथे त्यांचा सत्कार करून नियुक्तीपत्र व बॅच त्यांना प्रदान केले.

# हर घर तिरंगा अभियान अंतर्गत मनपा शाळांमध्ये तिरंगा रांगोळी व राखी स्पर्धा

**अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**

शासनाच्या निर्देशानुसार हर घर तिरंगा अभियान अंतर्गत अकोला महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये मनपा प्रशासनाव्दारा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या अंतर्गत दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी हरिपेठ येथील मनपा मराठी मुलांची शाळा क्रं. १९ मध्ये सैनिक आणि पोलिस कर्मचाऱ्यांसाठी विद्यार्थ्यांची तिरंगा राखी बनविण्याची कार्यशाळा संपन्न झाली आहे. या कार्यशाळेत मुख्याध्यापक मनोज बोचरे, शिक्षिका सुवर्णा सुरवाडे, मिनाक्षी भुरे, शिक्षक अशोक बुलबुले, कमल वानखडे, दिपाली भिके, सुनिता तामसकर, भारती परसलल्लू व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. तसेच दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी पोळा चौक येथील मनपा उर्दु मुलींची शाळा क्रं. ३ येथे विद्यार्थ्यांव्दारे रांगोळी




व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शहजाद परवेज, शिक्षिका गुलनाज परवीन, सीमा पांडे व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## ई-निविदा सूचना- ३४/२०२५-२६

१. **स्थापत्य विभाग ई. नि २३७ / कोड ३०००६०७९२ :-** औ.वि.के. पारस येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कार, मोटरसायकल, स्कुटर, सायकल स्टॅन्ड सतत २४ तास देखरेख आणि मेन्टेनन्स करिता द्विवार्षिक कामाचा कंत्राट. (Esti. रु.:- २०.२६ लाख, EMD रु.:- २३७६२/-)

२. **रा हा वि ई.नि २३८ कोड. ३०००६०८०२ :-** औ.वि.के. पारस राख हाताळणी विभाग संच ४ ई एस पी हॉपरच्या फिडर इजेक्टर सिस्टमसाठी वॉटर लाईन /ॲश लाईन व्हॉल्व्हचा पुरवठा करणे. (Esti. रु.:- ९.०० लाख, EMD रु.:- १२५०६/-)

३. **रा हा वि ई. नि २३९ कोड ३०००६०८०१ :-** औ.वि.के. पारस संच ४ ओव्हरहॉल दरम्यान राख उत्सर्जन प्रणालीमध्ये वॉटर लाईन नॉन-रिटर्न व्हॉल्व्हचा पुरवठा करणे. (Esti. रु.:- २.४९ लाख, EMD रु.:- ५९१७/-)

१) ई निविदा अ.क्र. १ विक्रिचा कालावधी दि. ०८.०८.२०२५ ते २८.०८.२०२५ सादर करण्याची दि २९.०८.२०२५ वेळ १६.०० वा.

२) ई निविदा अ.क्र. २ विक्रिचा कालावधी दि. ०८.०८.२०२५ ते १७.०८.२०२५ सादर करण्याची दि १८.०८.२०२५ वेळ १६.०० वा.

३) ई निविदा अ.क्र. ३ विक्रिचा कालावधी दि. ०८.०८.२०२५ ते १२.०८.२०२५ सादर करण्याची दि १३.०८.२०२५ वेळ १६.०० वा.

टीप : सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेबसाईट पहावी https://eprocurement.mahagenco.in

मुख्य अभियंता औ.वि. केंद्र, पारस

सर्वोच्च न्यायालयाला सध्या विश्वासार्हतेचे आणीबाणीनंतरचे सर्वात वाईट संकट भेडसावत आहे. देशभरातील न्यायालयात जे काही निकाल कानावर येऊन पडतात ते धक्कादायक आहेत. काही अपवाद वगळता न्यायालयाच्या कार्यकारणभावाचा दर्जा, निकालांमधील सातत्याचा अभाव, काही प्रकरणी न्यायालयाने त्याच्या घटनात्मक भूमिकेपासून घेतलेली फारकत तर, काही प्रकरणांत दाखवलेला अतिउत्साह यामुळे यापूर्वीच न्यायालयाच्या अधिकारांवर विपरीत परिणाम झाला आहे. त्यातच महाराष्ट्रातील भाजपच्या माजी प्रवक्त्याची चक्क न्यायाधीश म्हणून उच्च न्यायालयात नेमणूक झाल्याने राज्यात न्यायालयीन प्रक्रियेबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक व्यासपीठावरून सत्ताधारी पक्षाची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणे हा लोकशाही वरील सर्वात मोठा आघात आहे. परंतु हा आघात भाजपच्या माजी प्रवक्त्या आरती साठे यांच्या नियुक्तीवरून झाला आहे. त्यामुळे न्यायव्यवस्थेच्या निपःक्षपातीपणावर दुरगामी परिणाम झाल्याशिवाय राहील काय? केवळ पात्रतेमुळे राजकीय व्यक्तींना न्यायाधीश बनवणे म्हणजे न्यायपालिकेचा जणू राजकीय आखाडा बनविणे झाले आहे. यापूर्वीच भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार म्हणून मुंबईत एडवोकेट उज्वल निकम यांनी निवडणूक लढविली व ते पराभूत झाले. परंतु पराभूत झाल्याबरोबर सरकारी वकील म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्याचवेळी न्यायव्यवस्थेबद्दल चर्चा सुरू झाली होती. आता तर त्यांना राज्यसभेचे खासदार बनविले, याशिवाय सरकारी वकील म्हणूनही तेच काम पाहतात. या देशाच्या न्यायव्यवस्थेबद्दल यापूर्वी खुलेआम चर्चा कधीच होत नसायची. न्यायालयाबद्दल प्रचंड आदर असायचा. पण आता जनतेतही न्यायव्यवस्थेबद्दल खुलेआम चर्चा सुरू होत आहे. ही बाब सार्वजनिकरित्या चचेर्ला येणे योग्य नाही. सत्तेवर कुणाचा अंकुश निर्माण होऊन सत्तेचं केंद्रीकरण होऊ नये तसेच 'चेक अँड बॅलन्स' राहावा यासाठी संविधानात 'सेपरेशन ऑफ पॉवर'चं तत्व अवलंबलं आहे. राजकीय प्रवक्त्याची न्यायाधीशपदी नियुक्ती म्हणजे सेपरेशन ऑफ पॉवर'च्या तत्वाला आणि पयार्याने संविधानाला हरताळ फासण्याचा हा प्रयत्न नाही का? जेंव्हा उच्च न्यायालयातील न्यायाधीश पदावरील व्यक्ती राजकीय पार्श्वभूमी आणि सत्ताधारी पक्षातील पदाचा उपभोग घेतलेली असेल तेंव्हा न्यायदानाची प्रक्रिया राजकीय आकस बाळगून होणार नाही, याची खात्री कोण देणार? एका राजकीय व्यक्तीच्या नियुक्तीने पुर्ण न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही का?



# न्याय व्यवस्थेवरील हल्ले कसे थोपविणार?




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

आरती साठे या व्यक्तीबाबत नियुक्तीच्या पात्रतेबाबत कुठलाही आक्षेप नाही, परंतु संबंधित व्यक्तीची नियुक्ती करताना न्यायदान हे सामान्य नागरिकांसाठी कोणत्याही अभिनिवेशाशिवाय असते या सामान्य माणसांच्या भावनेलाच आघात बसत आहे. परिणामी संबंधित राजकीय व्यक्तीची न्यायाधीश पदावरील नियुक्तीबाबत पुनर्विचार करावाच लागणार आहे. सरन्यायाधीशांनीच याबाबत मार्गदर्शन करायला हवं.

सरकारी दरबारात सरकारची व्यक्ती म्हणून न्याय देणारी भूमिका घेणाऱ्यांना कशी बक्षीसी दिली जाते हे संपूर्ण देशाने पाहिले. महाराष्ट्रातील उदाहरण देखील सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. आरएसएसने उज्वल निकम यांना लोकसभेचे तिकिट देऊन त्यांच्या उपकाराची परतफेड तर केली, पण त्यांना लोकसभेत न जाता आल्याने राज्यसभेचा रस्ता खुला करून दिला.

आता तर भाजपच्या माजी प्रवक्त्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती पदी नियुक्तीला कॉलेजियमने मंजुरी दिली. मात्र त्यांच्या या नियुक्तीवरून विरोधकांनी आक्षेप घेतला आहे व त्यात तथ्यही आहे. भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये आरती साठे यांची भाजपच्या प्रवक्ते पदावर नियुक्ती केली होती. या नियुक्तीच्या अठरा महिन्यानंतर त्यांच्या नावाला कॉलेजियमकडून न्यायमूर्ती पदासाठी मंजुरी मिळाल्याने विरोधक प्रचंड भडकले आहेत.

तटस्थ वृत्तीने या केस कडे पाहिल्यावर साठे यांना न्यायाधीश पदावर बसण्यासाठी कॉलेजियमने परवानगी द्यायला नको होती. आता याबाबत सरन्यायाधीशांकडे फेरविचार करण्यासाठी विरोधी पक्षांकडून विनंती करण्यात येणार आहे. राजकीय पार्श्वभूमीमुळे साठे यांच्या नियुक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित व्यक्तीच्या पात्रतेवर विरोधकांचा आक्षेप नाही, पण त्यांची राजकीय पार्श्वभूमी न्यायदानाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकेल.

सामान्य माणसाचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राखण्यासाठी अशा प्रकारच्या नियुक्ती होणे योग्य नाही. सध्या न्यायालयाने स्वतःसाठी एक गंभीर संस्थात्मक संकट निर्माण केले आहे. त्यामुळे न्यायालय जो अधिकार अगदी हिरीरीने गाजवू इच्छिते त्याला आणखी तडे जाणार आहेत. त्यातून न्यायालयीन स्वातंत्र्याचा संकोच करण्याला अधिमान्यता मिळण्यास योग्य ती परिस्थिती निर्माण होईल.

या प्रकरणी ज्या गलिच्छ घडामोडी झाल्या त्यांची उजळणी करण्याची ही वेळ नव्हे. मात्र यातून न्यायपालिकेने स्वतःला संभाव्य धोक्यांप्रति कशा प्रकारे आरक्षित करून घेतले आहे याचा विचार केला पाहीजे. न्यायालयाने दिलेला प्रत्येक न्याय हा संशयातीत असला पाहिजे. न्यायपालिकेच्या स्वातंत्र्यावरच गदा येता कामा नये. यासाठी बरीच सावधगिरी बाळगण्याची गरज आहे

. एखाद्या न्यायाधीशाचे संशयितांमध्ये नुसते नाव घेतले जाणे हे देखील न्यायपालिकेचे स्वातंत्र्य पायदळी तुडवण्यासारखे असू शकते, यावर विचार केला पाहिजे. न्यायपालिकेसाठी असलेली अशी सूक्ष्म आव्हाने अगदीच काही शक्यतेच्या कक्षेबाहेर नाहीत. मात्र सध्या सुधारणांसाठी होत असलेल्या कल्लोळातून न्यायपालिकेला उत्तरदायी बनवण्याच्या नावाखाली तिचे स्वातंत्र्य पायदळी तुडवले जाण्याचीच शक्यता अधिक दिसते आहे. असा धोका असल्यानेच न्यायपालिकेचे वर्तन प्रामाणिक असले पाहिजे.

घटनात्मक मूल्यांच्या वतीने घडवलेल्या अस्सल कार्यकारणाभावातूनच न्यायालयाचा अधिकार आकारास येत असतो. बौद्धिक नेतृत्व प्रदान करण्यास असमर्थ ठरलेल्या सरन्यायाधीशांची आपल्याकडे मालिकाच आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या पद्धती झुगारून देत घटनापीठाची स्थापना करून सरन्यायाधीशांच्याच एका व्यवसायबंधूने त्यांचा संस्थात्मक पाणउतारा केल्याचे देशाने पाहीले आहे.

हितसंबंधांचा संघर्ष समजू न शकणारे न्यायाधीश आणि समाजासमोर आपलेच प्रतिमासंवर्धन करू पाहणारे न्यायाधीश यांच्यामध्ये न्यायपालिकेला आपले अस्तित्व टिकवणे अवघड दिसते. न्यायाधीशांची नेमणूक किंवा हितसंबंधांच्या संघर्षांची हाताळणी अशा बाबतीत न्यायालय गोंधळलेले आहे.

न्यायाधीशांमधील संवाद इतका कमी झाला आहे की, वरिष्ठ न्यायाधीशांना नेतृत्व करणे आणि सवार्ची एकत्र मोट बांधणे जिकिरीचे बनले आहे. ज्या पद्धतीने घटनापीठांची बांधणी केली जात आहे, त्यातून न्यायाधीशांमध्ये एकमेकांबद्दल असलेला अविश्वास अत्याधिक असल्याचे जाणवते.

वैयक्तिक न्यायाधीशांना जाणवणाऱ्या सद्गुणांच्या अवनतीमुळे न्यायपालिकेच्या एकत्रित लौकिकाला बाधा पोहचू लागली आहे. सध्याच्या अशांत काळात न्यायपालिका ही घटनात्मक दृष्टीने मार्गदर्शक तारा बनण्याऐवजी न्यायालये भारतीय संस्थांना लागलेल्या अत्यंत हीन किडीचे आणि भ्रष्टाचाराची लक्षणे बनली आहेत. आरती साठे हे एक प्रतिनिधिक उदाहरण समजायला हरकत नाही!

## आरती साठेंच्या नियुक्तीवर आक्षेप का?

राज्याच्या राजकारणात दोन वर्षांपूर्वी भाजपच्या प्रवक्त्या राहिलेल्या आरती साठे यांची मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश पदावर नियुक्ती वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सर्वोच्च न्यायालयातील कॉलेजियमने २८ जुलै रोजी मंजूर केलेल्या प्रस्तावानुसार मुंबई उच्च न्यायालयात तीन नवीन न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये आरती अरुण साठे, अजीत भगवानराव कडेथांकर आणि सुशील मनोहर घोडेश्वर यांची नेमणूक करण्यात आली आहे. भाजपच्या माजी प्रवक्त्या आरती साठे यांच्या नेमणुकीनंतर वादाला तोंड फुटलं आहे. सत्ताधाऱ्यांची बाजू मांडणाऱ्या व्यक्तीची न्यायाधीश म्हणून नेमणूक होणं चुकीचं असल्याचं मत आमदार रोहित पवारांनी मांडत त्यांच्या नियुक्तीवर आक्षेप घेतला. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्याबद्दल कायदेशीरदृष्ट्या ही नियुक्ती बरोबर आहे. कायदेशीर ही नियुक्ती योग्य असली तरी नैतिकदृष्ट्या चुकीची आहे. सरन्यायाधीशांच्या बरोबरची कॉलेजिअम सिस्टीम ही न्यायाधीशांची नियुक्ती करत असते. अशा पद्धतीने भारतीय जनता पार्टीच्या प्रवक्त्याची नियुक्ती चुकीची आहे. त्यामुळे सरन्यायाधीशांसह कॉलेजिअम सिस्टीम याला जबाबदार आहे. भारतीय जनता पार्टीच्यावतीने जो आधीचा दाखला देऊन प्रतिवाद केला गेला तो चुकीचा आहे. कारण तेव्हा कॉलेजिअम सिस्टीम नव्हती. आता आरती साठे यांची नियुक्ती झालेली आहे.

# मुलांना मिठी मारण्याची मॅन मम्स सर्व्हिस काय आहे?



आगळंवेगळं

आजकाल चीनमध्ये, मुली तणाव आणि भावनिक कमकुवतपणा दूर करण्यासाठी भाड्याने घेतलेल्या मोठ्या मुलांना मिठी मारतात. ही मुले त्यांना मिठी मारून आईसारखी भावना देतात.

आजकाल चीनमध्ये मॅन मम्स नावाचा एक नवीन ट्रेंड सुरू आहे. हा एक गट आहे जो तणावग्रस्त आणि भावनिकदृष्ट्या कमकुवत मुलींना ५ मिनिटांसाठी मिठी मारण्याची सेवा देतो. त्या बदल्यात मुली ६०० रुपये देत आहेत. या गटात जिममध्ये जाणारे आणि भावनिकदृष्ट्या प्रौढ मुले आहेत ज्यांच्याकडे आईची कोमलता आणि संयम आहे.

अलिकडेच, एका नैराश्यग्रस्त मुलीने ऑनलाइन पोस्ट केले की तिला तिच्या प्रबंधाच्या दबावाला तोंड देण्यासाठी तिच्या नवऱ्याच्या आईला मिठी मारायची आहे. तिने लिहिले, माध्यमिक शाळेत असताना मला एकदा मिठी मारण्यात आली होती आणि मला सुरक्षित वाटले.

**ही सेवा कशी काम करते?**

ही सेवा मिळविण्यासाठी, चीनमधील मुली सोशल मीडियावर 'मॅन मॉम्स' साठी पोस्ट करतात. त्यानंतर, मॅन मॉम्स ग्रुपशी संबंधित मुले त्यांच्याशी संपर्क साधतात. मुली या मुलांच्या प्रोफाइलवरून मॅन मॉम्स निवडतात. त्यांची फी २० ते ५० युआन (सुमारे २३० ते ५८०) पर्यंत असते. एका 'मॅन मम्स' ने सांगितले की मिठीसाठी शुल्क आकारल्याने भावनिक अंतर राखले जाते. तथापि, आता अनेक तज्ज्ञ या सेवेबद्दल सुरक्षिततेची चिंता व्यक्त करत आहेत. ■ ■ ■

# विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती.

जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला. त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले.

पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले.

लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली.

दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले.

वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले.

याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले.

हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले.

१९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली, मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा.

शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली.

तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव.

सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान



वाढली होती.

या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली.

सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली.

तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले.

सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली.

त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत.

दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली. मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही. उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली.

१४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणा?या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला.

मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# रक्षाबंधन : ब्रँडेड गोडी पेक्षा पारंपरिक गोडवा महत्वाचा..

वाचक लिहितात

सगळ्या नात्यांमध्ये सर्वात सुंदर असं नातं म्हणजे भाऊ-बहिणीचं नातं! बहिण-भावांमधील प्रेमाचे नाते अधिक घट्ट व्हावे याकरिता रक्षाबंधन हा सण आपण साजरा करतो. परंपरेनुसार विविध प्रांतांमध्ये पारंपरिक पद्धतीने घरी गोड पदार्थ बनवले जातात. महाराष्ट्रात ओल्या नारळापासून विविध पारंपरिक गोड पदार्थ बनवण्याची प्रथा आहे.

मात्र, हल्ली असं दिसून येतं की रक्षाबंधन जवळ येताच डेरी मिल्कसारख्या विदेशी चॉकलेट ब्रँडच्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर दाखवल्या जातात. ह्लनात्यातील गोडवा डेरी मिल्क चॉकलेटने वाढवूयाह्व, ह्लडेरी मिल्कसोबत रक्षाबंधन साजरा करूयाह्व असे संदेश वारंवार दाखवले जातात.

पण एक प्रश्न विचारण्यासारखा आहे, आपले सण साजरे करण्यासाठी विदेशी चॉकलेटची आवश्यकता कधीपासून भासू लागली? पारंपरिक भारतीय गोड पदार्थांची इतकी रेलचेल असताना खरंच चॉकलेटची गरज आहे का? आणि केवळ आपल्या सणांच्या काळात अशा जाहिराती दाखवल्या जातात, जेणेकरून लहान मुलांना त्याची भुरळ पडेल. अशा परिस्थितीत, एक सुज्ञ पालक म्हणून आपले कर्तव्य आहे की आपले सण हे आपल्या परंपरेनुसार, आपल्या पद्धतीने साजरे करावेत, याचे महत्त्व लहान मुलांना समजावून सांगणे आवश्यक आहे. यासाठी त्यांच्या मनात सणांमागील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांचं बीज रोवायला हवं. जेणेकरून ते जाहिरातींच्या प्रलोभनात न अडकता आपल्या सणांचे खरं स्वरूप समजून घेतील आणि परंपरेनुसार साजरे करण्यासाठी उद्युक्त होतील. यातूनच धर्माचरणाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबेल आणि एक आदर्श सुसंस्कृत पिढी निर्माण होईल.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा

# राहुल गांधी यांनी लोकभावना सांभाळून बोलावे!

राहुल गांधी हे देशातील सर्वात जुन्या राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख नेते आहेत. संसदेतील विरोधी पक्ष नेतेपदाचे दायित्वही त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे संसदेत बोलताना किंवा सार्वजनिकरित्या आपले मत मांडताना त्यांनी सामाजिक भान ठेवून तसेच जबाबदारीने मत मांडायला हवेः मात्र बऱ्याचदा या गोष्टीकडे ते गांभीर्याने पाहत नसल्याचे दिसून येते. त्यांनी लोकभावनांचा आदर करून जबाबदारीने वक्तव्ये करावीत याबाबत न्यायालयानेही त्यांना वेळोवेळी फटकारले असताना त्यांच्यात अपेक्षित पालट झालेला दिसून येत नाही. आतंकवाद, संरक्षण यांसारख्या संवेदनशील विषयांमध्येही त्यांची वक्तव्ये सामान्य जनतेच्या भावना दुखावणारी असतात. अशा विषयावर विरोधी पक्षाने आपले मत मांडताना राष्ट्रनिष्ठा, देशाची सुरक्षाविषयक धोरणे आणि सैनिकांचा त्याग यांविषयी योग्य तो आदर आणि संवेदना बाळगायला हव्यात. मात्र राहुल गांधी यांच्या बोलण्यात मात्र तसें जाणवत नाही. राष्ट्राप्रति जनतेच्या भावना नेहमीच आदराच्या असतात त्यामुळे राष्ट्राप्रति आदर आणि सन्मान बाळगणाऱ्या, देशाचे सर्वच दृष्टीने संरक्षण करू शकणा?या, शत्रूराष्ट्रात जरब निर्माण करणाऱ्या पक्षाच्या हाती जनता देशाची सत्ता सुपूर्द करते. राहुल गांधी यांची राजकीय सुडाने प्रेरित वक्तव्ये ऐकताना त्यामध्ये राष्ट्रभावना कुठेच दिसून येत नाही. मतदान करताना जनता या सर्व गोष्टीही लक्षात घेते याचे भान राहुल गांधी यांनी ठेवायला हवे.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.



## ब्रोकोली : या लोकांसाठी ठरू शकते हानिकारक

आरोग्याची काळजी घेत असताना योग्य आहार घेणे देखील महत्वाचे आहे. अशातच योग्य आहार घेताना अनेकजण ब्रोकोलीचे सेवन करत असतात. कारण ब्रोकोलीत असलेले पोषक तत्व, जीवनसत्त्वे आणि खनिजे आपल्या सर्वांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

कर्करोगाशी लढण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी आणि शरीराला आतून बळकट करण्यासाठी ब्रोकोलीला सुपरफूड मानले जाते. परंतु तुम्ही कधी विचार केला आहे का की ज्या भाजीला तुम्ही इतके फायदेशीर मानता ती काही लोकांच्या आरोग्यासाठी हानिकारक देखील असू शकते.

**थायरॉईडच्या समस्येने ग्रस्त असलेले लोक**

जर तुम्हाला थायरॉईडची समस्या असेल तर ब्रोकोली तुमच्यासाठी समस्या निर्माण करू शकते. ब्रोकोलीमध्ये गॉइट्रोजन नावाचा घटक असतो जो थायरॉईड संप्रेरकाचे उत्पादन थांबवू शकतो. जर तुम्हाला हायपोथायरॉईडीझमचा त्रास असेल तर ब्रोकोलीचे जास्त सेवन केल्याने तुमची समस्या आणखी गंभीर होऊ शकते. त्यामुळे थायरॉईडच्या रुग्णांनी ब्रोकोली खाणे टाळावे किंवा डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**गॅस आणि पोटफुगीची समस्या**

ब्रोकोलीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचनासाठी खूप चांगले असते, परंतु ज्या लोकांची पचनसंस्था कमकुवत असते किंवा ज्यांना अनेकदा गॅस आणि पोटफुगीची तक्रार असते त्यांच्यासाठी ब्रोकोलीचे सेवन हानिकारक ठरू शकते. ब्रोकोलीमध्ये असलेले फायबर आणि विशेष प्रकारचे कार्बोहायड्रेट्स पोटात गॅस निर्माण करू शकतात, ज्यामुळे तुम्हाला अस्वस्थता वाटू शकते.

**रक्त पातळ करणारी औषधे घेणारे रुग्ण**

ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन के भरपूर प्रमाणात असते. व्हिटॅमिन के रक्त गोठण्यास मदत करते. जर तुम्ही रक्त पातळ करणारी औषधे घेत असाल तर ब्रोकोली खाल्ल्याने या औषधांचा परिणाम कमी होऊ शकतो. यामुळे रक्त गोठण्याचा धोका वाढू शकतो. अशा परिस्थितीत या रुग्णांनी ब्रोकोली खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**किडनी स्टोनचे रुग्ण**

किडनी स्टोनच्या रुग्णांनीही ब्रोकोलीचे सेवन कमी करावे. ब्रोकोलीमध्ये पोटॅशियम असते, ज्यामुळे काही प्रकारचे किडनी स्टोन तयार होऊ शकतात. याशिवाय ब्रोकोलीमध्ये ऑक्सलेट देखील असते, जे शरीरात कॅल्शियमशी एकत्रित होते आणि स्टोन तयार होण्यास मदत करते. जर तुम्हाला किडनीशी संबंधित काही समस्या असतील तर तुमच्या आहारात ब्रोकोलीचा समावेश करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या. ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## सोशल प्रेशर

लोक काय म्हणतील चा
येई मानसिक ताण तणाव
मनाला पटत नसलं तरी
काही गोष्टी करतो ना राव..

मन मारून जगलं की
मन होते अस्वस्थ
यातुनच निर्माण होते
नकारात्मकतेचं प्रस्त..

व्यक्ती तितक्या प्रकृती
त्यामुळे उठेल टिकेची झोड
तुझ्या अंतर्मनाला जे पटतं
ते भाऊ तू कर सडेतोड..

# भारत आता दहशतवादावर डोसियर नाही, थेट क्षेपणास्त्र पाठवतो

**मुंबई, ७ ऑगस्ट :** भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी अलीकडेच दिलेल्या मुद्देसूद भाषणातून हे स्पष्ट केलं की भारताची सध्याची राष्ट्रीय सुरक्षाव्यवस्था विरोधकांच्या चुकांवर कशी योग्य तोडगा काढत आहे. काँग्रेसच्या राजकारणामुळे देशाला जे जखमांचे दु:ख भोगावे लागले, ते आजही पाकिस्तान समर्थनाने चालणाऱ्या दहशतवादाच्या रूपात दिसून येते. पंडित नेहरूंच्या ऐतिहासिक चुकांमुळेच पीओके (पाकव्याप्त काश्मीर) तयार झाला आणि त्याच काळात भारताचे ३८,००० चौरस किलोमीटर क्षेत्र चीनच्या ताब्यात गेले.१९७१ मधील विजयानंतरही, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारने १५,००० चौरस किलोमीटर भूमी व पीओके ताब्यात घेण्याची संधी गमावली. उलट, त्यांनी पाकिस्तानच्या ९३,००० युद्धकैद्यांना सोडून इतिहासातील सर्वात मोठी रणनीतिक चूक केली. विरोधकांच्या अशाच आणि कमजोर दृष्टिकोनामुळेच दहशतवादाला खतपाणी मिळाले. जमात-ए-इस्लामी व हुर्रियतसारख्या संघटनांना काँग्रेसने मोकळा पाठिंबा दिला आणि त्यामुळे संपूर्ण काश्मीर खोऱ्यावर दहशतीचा विळखा बसला. याच कारणामुळे भारत अनेक दशके दहशतवादाच्या आगीत होरपळत राहिला. बाटला हाऊस एन्काउंटरमध्ये मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांवर अश्रू ढाळले, पण शहीद मोहन चंद्र शर्मांसाठी संवेदनाही व्यक्त केली नाही ही काँग्रेसच्या मानसिकतेची खरी ओळख आहे.

पण आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ठाम राजकीय इच्छाशक्तीने आणि केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शाह यांच्या दूरदृष्टीपूर्ण योजनांनी असे काम करून दाखवले आहे, जे काँग्रेससाठी अशक्य होते. आज फक्त भारतच नाही, तर संपूर्ण जग पाहत आहे की भारत आता दहशतवादाविरोधात फक्त अहवाल (डोज़ियर) पाठवत नाही, तर थेट क्षेपणास्त्र (मिसाइल) पाठवतो.

ऑपरेशन सिंदूर हे याचे ठोस उदाहरण आहे की मोदी सरकारच्या काळात आधुनिक शस्त्रांनी सज्ज आपली सेना पाकिस्तानची संपूर्ण हवाई



संरक्षण प्रणाली फक्त अर्ध्या तासात जमीनदोस्त करण्याची ताकद ठेवते. शत्रूच्या भागात घुसून त्यांचा नाश करणारे ऑपरेशन सिंदूर आणि पहलगामच्या भयंकर दहशतवाद्यांचा खात्मा करणारे ऑपरेशन महादेव यांनी भारताच्या अजेय शक्तीचा इशारा जगाला दिला आहे. तरीसुद्धा विरोधकांनी या ऐतिहासिक विजयांना त्यांच्या स्वत:च्या छोट्या राजकीय स्वार्थासाठी कमी लेखण्याचा प्रयत्न केला.

आज पाकव्याप्त काश्मीर (पीओके ) विषयी चिंता केवळ विरोधकांच्या निवेदनांपुरतीच मर्यादित आहे, पण राष्ट्राला माहीत आहे की ते परत आणण्याचे काम फक्त मोदी सरकारच करू शकते. संवेदनशील आणि ठाम नेतृत्वाचा हा संकल्प आता ठरलेला आहे की जोपर्यंत शत्रू घाबरत नाही किंवा सुधारत नाही, तोपर्यंत दहशतवादाला मूळापासून नष्ट केलं जाईल. विरोधकांची निराशा हे दाखवते की दहशतवादी तळांवर भारताची ठाम कारवाई त्यांच्या मतांच्या राजकारणाला धक्का पोहचवत आहे. दहशतवादमुक्त भारताच्या निर्मितीसाठी कटिबद्ध असलेले अमित शाह यांनी हे स्पष्टपणे सांगितले आहे की आता भारत दहशतवादी तळांचा नाश करेल आणि दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्यांना उघड करून जगासमोर आणेल.

२०१९ मध्ये केंद्रीय गृहमंत्रीपदाची जबाबदारी घेताच, भारतीय राजकारणातील चाणक्य अमित शाह यांनी काश्मीर खोऱ्याला दहशतवादाच्या जाळ्यातून मुक्त करण्याचा संकल्प केला. खोऱ्यात दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या अनेक संस्थांवर बंदी घालण्यात आली आणि कलम ३७० हटवून काश्मीरला तीन घराण्यांच्या तावडीतून सोडवून, सामान्य जनतेला खऱ्या अर्थाने सत्तेचा खरा हक्कदार बनवण्यात आले.त्यामुळे दहशतवादी घटनांमध्ये ७० टक्क्यांनी घट झाली, गेल्या तीन वर्षांत खोऱ्यात एकही संघटित बंद झाला नाही आणि काश्मिरी तरुण दहशतवादी संघटनांपासून पूर्णपणे दूर गेले. आज काश्मीरमध्ये दगडफेक पूर्णपणे थांबली आहे, दहशतवाद्यांचे जनाजे काढले जात नाहीत आणि त्यांना ते जिथे मारले जातात तिथेच पुरण्यात येते. हा ऐतिहासिक बदल मोदी सरकारच्या दूरदृष्टीमुळे आणि अमित शाह यांच्या ठाम इच्छाशक्तीमुळे शक्य झाला आहे.

अमृतकालात भारताचा बुलंद आवाज संपूर्ण जगात घुमत आहे. विरोधकांनी कितीही बदनामीचा प्रयत्न केला, तरी १४० कोटी भारतीय नवभारताच्या निर्मितीसाठी मोदी आणि शाह यांच्या सोबत ठामपणे उभे आहेत.

## इंडसइंड बँकेने राजीव आनंद यांची एमडी आणि सीईओ म्हणून नियुक्ती केली जाहीर



**मुंबई, ७ ऑगस्ट :** इंडसइंड बँक लिमिटेडच्या संचालक मंडळाने आज राजीव आनंद यांची बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (एमडी आणि सीईओ) म्हणून नियुक्ती जाहीर केली. ते २५ ऑगस्ट २०२५ पासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी हा कार्यभार सांभाळतील.

राजीव आनंद यांना बँकिंग आणि वित्त क्षेत्रातील ३५ वर्षांहून अधिक अनुभव असून त्यांनी या क्षेत्रातील अनेक महत्त्वाच्या भूमिका पार पाडल्या आहेत. त्यांनी अलीकडेपर्यंत ऍक्सिस बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पाहिले. त्यांनी कॅपिटल मार्केट्स, ट्रेझरी आणि ॲसेट मॅनेजमेंटमध्ये विशेष अनुभव आहे आणि त्यांनी खाजगी तसेच कॉर्पोरेट बिझनेसच्या वाढीत मोलाची भूमिका बजावली आहे.

या नियुक्तीद्वारे, बँकेने योग्य कौशल्ये आणि दृढ मूल्ये असलेले एमडी आणि सीईओ तत्काळ ओळखण्याच्या आपल्या वचनबद्धतेवर शिक्कामोर्तब केले आहे.

या नियुक्तीबाबत भाष्य करताना इंडसइंड बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष सुनील मेहता म्हणाले: संचालक मंडळाच्या वतीने, राजीव आनंद यांचे बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून स्वागत करत मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. संचालक मंडळ राजीव आणि व्यवस्थापन टीमसोबत जवळून काम करण्यास उत्सुक आहे, जेणेकरून बँकेच्या वाढीला बळ मिळेल आणि उत्तम प्रशासन मानकांना प्राधान्य दिले जाईल. या संपूर्ण प्रक्रियेत अमूल्य पाठिंबा दिल्याबद्दल भारतीय रिझर्व्ह बँकेचे मन:पूर्वक आभार मानतो. संचालक मंडळ, व्यवस्थापन आणि सर्व कर्मचारी राजीव यांचे इंडसइंड कुटुंबात स्वागत करण्यासाठी आणि या संस्थेला तिच्या पूर्ण क्षमतेपर्यंत नेण्यासाठी सज्ज आहेत.

# भारत धोरणात्मक बाजारपेठ आहे : जेबी पर्क



**गुरूग्राम, ७ ऑगस्ट :** सॅमसंगचे सातव्या पिढीमधील फोल्डेबल स्मार्टफोन्स – गॅलॅक्सी झेड फोल्ड७, झेड फ्लिप७ आणि झेड फ्लिप७ एफई यांना भारतात अनपेक्षित मागणी दिसण्यात आली असून स्वावलंब बाजारपेठांमध्ये या स्मार्टफोन्सचा साठा संपला आहे, असे कंपनीने सांगितले. सॅमसंगला ९ जुलै २०२५ रोजी गॅलॅक्सी झेड फोल्ड७, झेड फ्लिप७ आणि झेड फ्लिप७ एफई लाँच झाल्यापासून पहिल्या ४८ तासांमध्ये या स्मार्टफोन्ससाठी २.१ लाखांहून अधिक प्री-ऑर्डर्स मिळाल्या.

या शानदार विक्रीच्या पार्श्वभूमीवर, सॅमसंग साउथवेस्ट आशियाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पर्क म्हणाले की, भारत प्रचंड क्षमता असलेली महत्त्वाची धोरणात्मक बाजारपेठ आहे आणि सॅमसंगच्या जागतिक भविष्यातील महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.

''सॅमसंगला भारतातील विकासगतीबाबत आशा आहे, ज्याला मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया यांसारखे सरकारी उपक्रम आणि प्रबळ डिजिटल परिसंस्थेचे पाठबळ आहे. सॅमसंग भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनाशी सुसंगत राहत नाविन्यता, उत्पादन आणि स्थानिक मूल्य वाढीमध्ये गुंतवणूक करत आहे,'' असे पर्क म्हणाले.

नवीन फोल्डेबल स्मार्टफोन्स – गॅलॅक्सी झेड फोल्ड७, गॅलॅक्सी झेड फ्लिप७ आणि गॅलॅक्सी झेड फ्लिप७ एफई हे सॅमसंगच्या नोएडामधील कारखान्यामध्ये उत्पादित केले जात आहेत. बेंगळुरूमध्ये सॅमसंगच्या आरअँडडी केंद्रामध्ये काम करणाऱ्या भारतीय अभियंत्यांनी या नवीन फोल्डेबल्सच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे कंपनीने सांगितले.

''सॅमसंगची भारताप्रती दीर्घकालीन कटिबद्धता अविरत आहे, जेथे आम्ही देशाकडे आमच्या जागतिक धोरणाचा आधारस्तंभ म्हणून पाहतो. दोन उत्पादन प्लांट्स, तीन आरअँडडी केंद्रे आणि डिझाइन केंद्रासह सॅमसंग इंडिया स्थानिक मागणी आणि जागतिक बाजारपेठांच्या गरजांची पूर्तता करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते,'' असे पुढे म्हणाले.

सॅमसंगच्या फोल्डेबल्सच्या उत्क्रांती प्रवासाबाबत पर्क म्हणाले, डिवाइसेसचा आकार लहान करण्याची संकल्पना आहे. ''आम्ही ५-इंच स्मार्टफोन डिझाइन केला तेव्हा आम्हाला वाटले की आमचा सर्वात मोठा व सर्वोत्तम स्मार्टफोन आहे. आता, स्क्रिनचा आकार ६.९ इंचापर्यंत वाढवण्यात आला आहे आणि अधिकाधिक मोठे होत आहे. काही स्मार्टफोन्स खिशामध्ये मावत नाहीत, तसेच ते धरायलाही कठीण जातात. म्हणून आम्ही या स्मार्टफोन्सचा आकार कशाप्रकारे लहान करू शकतो याचा विचार करण्यास सुरूवात केली. त्यामधूनच आम्ही या स्मार्टफोन्सना फ्लिप किंवा फोल्ड करण्याचे ठरवले. माझ्या मते, हा ट्रेण्ड आहे, ज्याचे इतर ब्रँड्स अनुकरण करतील,'' असे पर्क म्हणाले.

# डीपीएस लावा नागपूरच्या अदालत ३.० इंटर-स्कूल कोर्टरूम सिम्युलेशन स्पर्धेचा यशस्वी समारोप

**नागपूर (लावा), ७ ऑगस्ट :** दिल्ली पब्लिक स्कूल, लावा, नागपूर यांनी अलीकडेच २ आणि ३ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या प्रमुख इंटर-स्कूल कोर्टरूम सिम्युलेशन कार्यक्रमाचा तिसरा टप्पा अदालत ३.० यशस्वीपणे आयोजित केला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता, एकत्र काम करण्याची भावना आणि समाजातील जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता, जेणेकरून त्यांना कायदा आणि न्यायाच्या रोमांचक जगाचा अनुभव घेता येईल. विद्यार्थ्यांना स्वत:मध्ये विकास करता यावा आणि नवीन गोष्टी शिकता याव्यात, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या अदालत ३.० या उपक्रमात विदर्भातील विविध शाळांमधून ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी वकील, न्यायाधीश, साक्षीदार आणि जागरूक नागरिक अशा भूमिका साकारल्या. प्रत्येक विद्यार्थ्याने गुंतागुंतीच्या कायदेशीर खटल्यांवर काम करताना आपली विचारशक्ती, तर्कशुद्ध विचार आणि बोलण्याचे कौशल्य दाखवले.

या कार्यक्रमाला सन्माननीय पाहुणे म्हणून प्रा. (डॉ.) सुखविंदर सिंग दारी हे उपस्थित होते. ते एक प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि कायद्यातील जाणकार असून सध्या सिम्बायोसिस लॉ स्कूल, नागपूरचे डायरेक्टर म्हणून कार्यरत आहेत. आपल्या भाषणात डॉ. दारी यांनी न्याय ही एक मानसिक अवस्था आहे या विषयावर आपले विचार मांडले. त्यांनी एका मुलाची खूप प्रेरणादायी खरी गोष्ट सांगितली, जो चहाच्या टपरीवर काम करत होता आणि पुढे जाऊन एक नामांकित वकील बनला. डॉ. दारी यांनी पुस्तकातील शैक्षणिक शिक्षणासोबत प्रत्यक्ष कायद्याचा अनुभव देण्यासाठी शाळेने घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सत्य आणि न्याय यांची मूल्ये जपण्याचा सल्ला दिला. शाळेच्या प्राचार्या डॉ. अनुपमा सगदेव यांनी डीपीएस लावामधील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध लीडरशिप प्रशिक्षण उपक्रमांची माहिती दिली आणि अदालत हा त्यातील एक महत्त्वाचा उपक्रम असल्याचे सांगितले.

डीपीएस लावाच्या विद्यार्थ्यांनी उद्घाटन समारंभात कर्णाच्या जीवनकथेवर आधारित एक आकर्षक नृत्य सादर केले.

या दोन दिवसांच्या उत्साही कार्यक्रमात विविध समित्यांनी मेहनतीने काम केले आणि खटल्यांवर सखोल चर्चा केली. प्रत्येक समितीतून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना ट्रॉफी आणि प्रशंसा प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात सर्वाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या स्कूल ऑफ स्कॉलर्स, अमरावती या शाळेला ओव्हरऑल चॅम्पियनशिप ट्रॉफी देण्यात आली. प्राचार्या डॉ. अनुपमा सगदेव आणि उपप्राचार्य श्री. अतुल देव यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान त्यांच्या उत्तम कामगिरीसाठी देण्यात आला. कार्यक्रमाच्या समारोपाला आमचे विद्यार्थी रुग्वेद आणि शाळेचे माजी विद्यार्थी नमन जैन यांच्या बँडने एक जोशपूर्ण संगीत कार्यक्रम सादर केला, ज्यामुळे संपूर्ण कार्यक्रमाचा समारोप अत्यंत उत्साही आणि संस्मरणीय झाला.

अदालत ३.० या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ २१व्या शतकातील आवश्यक कौशल्येच मिळाली नाहीत, तर प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची, नेतृत्व गुण विकसित करण्याची आणि कायदेशीर व नागरी ज्ञानाचा वापर प्रत्यक्ष जीवनात कसा करायचा हेही शिकण्याची संधी मिळाली. हा कार्यक्रम जबाबदार, स्पष्ट विचार करणारे आणि भविष्यासाठी तयार अशी पिढी घडवण्याच्या शाळेच्या प्रयत्नांना योग्य दिशा देणारा ठरला.

# सुपर.मनीचा फ्लाइट्सच्या अनावरणासह प्रवासी क्षेत्रात प्रवेश

**बंगळुरू, ७ ऑगस्ट :** भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या यूपीआय-फर्स्ट प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या सुपर.मनीने आज 'फ्लाइट्स'च्या अनावरणाची घोषणा केली. हा एक आगळावेगळा, भरपूर रिवॉर्ड्स देणारा फ्लाइट बुकिंग अनुभव आहे जो प्रामुख्याने जेन झी प्रवाशांसाठी बनवला गेला आहे. क्लिअरट्रिपकडून पाठबळ मिळालेले हे नवीन वैशिष्ट्य वापरकर्त्यांना यूपीआयद्वारे सहजपणे देशांतर्गत उड्डाणे बुक करण्यास सक्षम करते, तर इतर ऑफर्सवर विशेष ५% फायदा अनलॉक करते. त्यामुळे फ्लाइट बुक करण्याचा हा सर्वात फायदेशीर मार्ग ठरेल. या अनावरणामुळे यूपीआय काय काय करू शकते हे दाखवण्याची सुपर.मनीची महत्त्वाकांक्षा आणखी वाढली आहे. फ्लाइट्समुळे सुपर.मनी या क्षेत्रातील आघाडीचा यूपीआय म्हणून आपले स्थान मजबूत करते आणि यूपीआयला मूलभूत व्यवहार साधनापासून अर्थपूर्ण, उच्च-मूल्याच्या व्यापारासाठी व्यासपीठात रूपांतरित करते. त्यामुळे क्रेडिट कार्ड आणि यूपीआयमधील फायद्यांमधील अंतर कमी होते, तसेच पेमेंट सोपे, सुरक्षित आणि त्वरित होते.

अलीकडील क्लिअरट्रिपच्या माहितीतून असे दिसते की जेन झी ग्राहक (१९९७ ते २०१२ या दरम्यान जन्मलेले) प्रवासाच्या वर्तनात बदल घडवून आणत आहेत. फक्त अनुभवांना, आराम आणि वैयक्तिक स्वातंत्र्याला प्राधान्य देणे आणि क्रेडिट-आधारित पेमेंटपेक्षा यूपीआय आणि डेबिट कार्ड निवडणे. खरेतर, जेन झी इतर वयोगटांपेक्षा १०% अधिक यूपीआय व्यवहारांसह यूपीआयच्या वापरात आघाडीवर आहे. सुपर.मनी तरुण भारतीयांना फक्त यूपीआयद्वारे फ्लाइट बुक करण्याचा मार्ग देऊन या बदलाला स्वीकारत आहे. तेही बक्षिसे, फायदे किंवा नियंत्रणाचा त्याग न करता. हे जेन झीच्या सुलभता, त्वरित समाधान आणि कर्जमुक्त आर्थिक पर्यायांच्या पसंतीशी जुळते.

फ्लाइट्स' सह आम्ही यूपीआयवरील प्रवास बुकिंगमध्ये मूल्यवर्धन करत आहोत, असे मत सुपर.मनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश सिकारिया यांनी व्यक्त केले. हे पाऊल यूपीआयला केवळ दैनंदिन खर्चापुरते मर्यादित न ठेवता जीवनातील मोठे क्षण देखील सक्षम करण्याच्या आमच्या मोठ्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंबि आहे. एकट्याने प्रवासाचे बुकिंग असो किंवा स्वप्नातील सुट्टीचे बुकिंग असो, सुपर.मनीवरील फ्लाइट्सवरून निर्णय अधिक स्मार्ट, जलद आणि अधिक फायदेशीर होईल.

क्लिअरट्रिपमध्ये आम्हाला फ्लाइट बुकर्समध्ये पेमेंटचा पसंतीचा मार्ग म्हणून यूपीआय स्वीकारण्यात लक्षणीय वाढ दिसून येत आहे, असे क्लिअरट्रिपच्या मुख्य व्यवसाय आणि विकास अधिकारी मंजरी सिंघल म्हणाल्या. हा ट्रेंड जेन झी प्रवाशांमध्ये अधिक स्पष्टपणे दिसून येतो. ते यूपीआय व्यवहारांच्या सहजतेने, वेगाने आणि कर्जमुक्त स्वरूपाकडे आकर्षित होतात. प्रवास क्षेत्रातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या ग्राहक विभागांपैकी एकाला सेवा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेला हे बदल अधिक दृढ करतात.

भारतातील ८५% डिजिटल व्यवहार आता यूपीआयद्वारे होतात (आयएमएफ, २०२४), सुपर.मनी हे जेन झीच्या अपेक्षेनुसार एक वातावरण तयार करत आहे: जिथे पेमेंट केवळ कार्यात्मक नसून सक्षमीकरण करतात. एकेकाळी लक्झरी मानला जाणारा प्रवास आता जीवनशैलीची गरज बनला आहे आणि सुपर.मनीमुळे पेमेंट वेगाने सुरू राहील याची काळजी घेतली जात आहे.

फ्लाइट्सच्या अनावरणामुळे या श्रेणीत आघाडी घेणारी शक्ती म्हणून सुपर.मनीची भूमिका साधेपणा, नियंत्रण आणि खऱ्या अर्थाने मूल्य शोधणाऱ्या भारतातील नवीन युगातील ग्राहकांसाठी वन-स्टॉप डेस्टिनेशन म्हणून मजबूत आहे.

# अदाणी पॉवरला बिहारमध्ये २,४०० मेगावॅट क्षमतेचा नवीन ग्रीनफील्ड थर्मल पॉवर प्लांट उभारण्यास मान्यता मिळाली

**अहमदाबाद, ७ ऑगस्ट :** अदाणी पॉवर लिमिटेडला बिहार राज्य विद्युत उत्पादन कंपनी लिमिटेड (बीएसपीजीसीएल) कडून लेटर ऑफ इंटेंट (एलओआय) प्राप्त झाला आहे. या पत्राअंतर्गत, अदाणी पॉवरला भागलपूर जिल्ह्यातील पीरपैंती येथे उभारण्यात येणाऱ्या २,४०० मेगावॅट क्षमतेच्या थर्मल पॉवर प्लांटमधून उत्तर बिहार विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एनबीपीडीसीएल) आणि दक्षिण बिहार विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एसबीपीडीसीएल) यांना २,२७४ मेगावॅट वीज पुरवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

अदाणी पॉवरचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. बी. ख्यालिया म्हणाले, बिहारमध्ये २,४०० मेगावॅट क्षमतेचा थर्मल पॉवर प्रकल्प उभारण्यासाठीची निविदा जिंकून आम्हाला आनंद होत आहे. आम्ही सुमारे ३ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करून एक नवीन ग्रीनफील्ड प्लांट उभारणार आहोत, जो राज्यातील औद्योगिकीकरणाला अधिक गती देईल. हा प्लांट आधुनिक आणि कमी प्रदूषण करणारा अल्ट्रा-सुपरक्रिटिकल प्रकारचा असेल, जो बिहारला विश्वासार्ह, परवडणाऱ्या दरात आणि उच्च दर्जाची वीज उपलब्ध करून देईल.

या प्रकल्पासाठी इंधनाची तरतूद भारत सरकारच्या शक्ती धोरणांतर्गत मंजूर झालेल्या कोळसा लिंकिंग द्वारे केली जाईल. बांधकामाच्या टप्प्यात या प्रकल्पामुळे सुमारे १०,००० ते १२,००० लोकांना थेट आणि अप्रत्यक्षरित्या रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे, तर प्रकल्पाचे संचालन सुरू झाल्यानंतर सुमारे ३,००० लोकांना कायमस्वरूपी रोजगार मिळेल. कंपनीला लवकरच एलओए (लेटर ऑफ अवॉर्ड) मिळण्याची अपेक्षा आहे, त्यानंतर राज्यातील युटिलिटी कंपन्यांसोबत वीजपुरवठा करार वर स्वाक्षऱ्या केल्या जातील.

# एचडीएफसी बँकेने नागरिकांना एपीके फसवणुकीबाबत सावध राहण्याचा महत्त्वाचा संदेश दिला

**मुंबई, ७ ऑगस्ट :** भारतातील सर्वात मोठी खासगी बँक असलेल्या एचडीएफसी बँकेने ग्राहकांना एपीके (अँड्रॉईड पॅकेज किट) फसवणुकीपासून सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. या फसवणुकीविषयी जागरूकता वाढवून ग्राहकांचे संरक्षण करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे.

एपीके फसवणुकीमध्ये फसवणूक करणारे सहसा बँकेचे कर्मचारी किंवा सरकारी अधिकारी असल्याचे भासवून लोकांची संपर्क करतात. . ते एखादा मेसेज पाठवतात ज्यात एक एपीके फाइल (मोबाईल ॲपसारखी फाइल) असते, ही फाइल बनावट असते पण ती सरकारी संस्था किंवा बँकेकडून आल्यासारखी वाटते. जेव्हा कोणी ती फाइल डाऊनलोड करून आपल्या मोबाईलमध्ये इन्स्टॉल करतो, तेव्हा फसवणूक करणाऱ्या व्यक्तीला संबंधित मोबाईल फोनवर पूर्ण ॲक्सेस मिळते. त्यामुळे तो फसवेखोर मोबाईलवरील कॉल्स आणि मेसेज दुसऱ्या डिव्हाईसकडे वळवू शकतो आणि मोबाईलमधील माहिती चोरू शकतो, बँक खात्यात प्रवेश मिळवून परवानगीशिवाय पैसे ट्रान्सफर करू शकतो. म्हणूनच, एचडीएफसी बँकेने ग्राहकांना अशा फसवणुकींपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे..

ही फसवणूक कशी केली जाते:

फसवणूक करणारे सामान्यत: सरकारी अधिकारी, बँकेचे कर्मचारी किंवा प्रसिद्ध कंपन्यांचे प्रतिनिधी असल्याचे भासवतात. ते री-केवायसी करणे, ट्रॅफिक चालान भरणे, इनकम टॅक्सचा परतावा मिळवणे इत्यादी कारणांवरून संपर्क करतात. अशा वेळी, पीडिताला एक बनावट एपीके लिंक असलेला मेसेज पाठवतात.

पीडित व्यक्ती त्या लिंकवर क्लिक करताच, त्यांच्या मोबाईलमध्ये एक मालवेअर (सॉफ्टवेअर व्हायरस) नकळतपणे इन्स्टॉल होतो आणि त्यांना त्याची कल्पनाही राहत नाही.

काही उदाहरणे:

(अ) फसवणूक करणारे लोक फोन कॉल, ई-मेल किंवा मेसेजद्वारे ग्राहकांशी संपर्क साधतात आणि बँकेकडून बोलत असल्याचे सांगतात. ते म्हणतात की केवायसी तात्काळ अपडेट करणे आवश्यक आहे, नाहीतर खाते बंद होईल अशी भीती दाखवतात. त्यानंतर एक बनावट एपीके लिंक पाठवतात ज्यामध्ये बँकेचा लोगोही असू शकतो आणि ती ॲप इन्स्टॉल करण्यास सांगतात. हे ॲप इन्स्टॉल केल्यावर ग्राहकांना त्यांचे बँक खाते क्रमांक, डेबिट/क्रेडिट कार्ड माहिती, ओटीपी वगैरे टाकण्यास सांगितले जाते, आणि ही माहिती त्वरित चोरली जाऊन फसवणुकीसाठी वापरली जाते.

(ब) काही वेळा फसवेखोर प्रादेशिक परिवहन कार्यालय चे अधिकारी असल्याचे सांगतात. ते लोकांना ई-चलान भरायचा आहे, असे सांगणारे बनावट मेसेज किंवा ईमेल पाठवतात. त्या मेसेजमध्येही धोकादायक एपीके लिंक असते. वापरकर्त्याने त्या लिंकवर क्लिक करताच त्यांचा मोबाईल पूर्णपणे हॅक होतो, आणि फसवणूक सुरू होते.

## आज का अंदाज

शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| ३४५ | ४९० | ३३० | ११७ | ६७९ | २४९ | ७९० | ४५८ |
| १५६ | ५८० | ७९० | ५६८ | ११० | ३५७ | ४६६ | ३६८ |
| २२७ | ६७० | ११४ | ३८८ | २२८ | ११३ | ११४ | २७८ |
| २४ | ३४ | ६१ | ९१ | २१ | ५१ | ६८ | ७८ |
| २० | ३० | ६७ | ९७ | २३ | ५३ | ६० | ७० |
| २८ | ३८ | ६५ | ९५ | २९ | ५९ | ६४ | ७४ |

८ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ४९ | ७२ | ८२ |
| १० | ४० | ७३ | ८३ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ |
| १२८ | १५८ | १८८ | २६० |
| २९० | ३४७ | ५६६ | ४५९ |
| ५७९ | ६९९ | २७८ | ३६९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# झी टीव्हीच्या सरू मालिकेत मोहक मटकर ऊर्फ सरूचा मंत्रमुग्ध करणारे राजस्थानी कठपुतळी नृत्य



**मुंबई, ७ ऑगस्ट :** झी टीव्हीवरील सरू ही मालिका सध्या उच्च दर्जाच्या नाट्यमय घडामोडींमुळे प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. अनिका (अनुष्का मर्चंडे) ही वेद (शगुन पांडे) याच्याशी साखरपुडा करण्यासाठी सतत योजना रचत आहे. या सगळ्या गोंधळात सरू (मोहक मटकर) ही साखरपुडा थांबवण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावत आहे. तिच्या डोळ्यांतून व्यक्त होणारी भावनात्मक ताकद, नाजूक अभिनय आणि तेजस्वी उपस्थिती यामुळे मोहक मटकरने प्रेक्षकांच्या मनावर एक विशेष ठसा उमटवला आहे.

एका आगामी थरारक प्रसंगात मोहक मटकर पारंपरिक राजस्थानी कठपुतळी नृत्य सादर करताना प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणार आहे. या सांस्कृतिक सादरीकरणात प्राण फुंकण्यासाठी मोहकने राजस्थानी कठपुतळी नृत्याच्या बारकाव्यांमध्ये स्वत:ला पूर्णपणे झोकून दिले. स्वत: एक प्रशिक्षित शास्त्रीय नृत्यांगना असल्याने तिने या नृत्यशैलीतील नाजूक हावभाव आणि लयबद्ध हालचाली आत्मसात करण्यासाठी तासन्तास मेहनत घेतली. शिवाय, पारंपरिक राजस्थानी पोशाखासाठी ती वेशभूषा टीमसोबत जवळून काम करत होती.

या प्रसंगाबद्दल बोलताना मोहक मटकर म्हणाली, सरूची भूमिका साकारणे ही एक अद्भुत अनुभूती आहे, आणि हे नृत्यदृश्य माझ्यासाठी खास आहे कारण यामुळे प्रेक्षकांना सरूचा एक वेगळा पैलू पाहायला मिळतो. नृत्य हा नेहमीच माझा जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे, आणि मी एक प्रशिक्षित शास्त्रीय नृत्यांगना असल्यामुळे एक वेगळी नृत्यशैली शिकण्याची संधी मिळणे मला खूप आवडले.

# सोनी सबवरील प्रेक्षकांचे लाडके कलाकार रक्षाबंधन सणाविषयी आणि बहीण-भावाच्या नात्याविषयी सांगत आहेत

मुंबई, ७ ऑगस्ट : रक्षाबंधन म्हणजे केवळ मनगटावर धागा बांधणे नाही. हा हृदयांना जोडणारा सण आहे, सुंदर आठवणी आणि भावंडांमधील अतूट नात्याचा गौरव करणारे हे पर्व आहे. समस्त देश एकत्वाच्या भावनेने आपल्या देशाची ही जुनी परंपरा साजरी करण्यासाठी सज्ज असताना, सोनी सबवरील लोकप्रिय कलाकार- शब्बीर अहलूवालिया, आशी सिंह, आन तिवारी आणि गरिमा परिहार आपल्या लहानपणीच्या आठवणी सांगत आहेत. राखीचा सण खास बनवणारे ते खेळकर क्षण, लुटुपुटीची भांडणे आठवत आहेत. त्यांच्या आठवणींतून या सणातील गोडवा जाणवतो, पडद्यावर ही नाती इतकी सहज कशी साकारता येतात, याचे गमक दिसते.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका करणारी गरिमा परिहार म्हणते, माझा भाऊ आणि माझ्यात १० वर्षांचे अंतर असले तरी आमच्या नात्यात प्रगल्भता आणि मस्ती यांचे मस्त संतुलन आहे. प्रत्येक रक्षाबंधन त्या खास नात्याची आठवण करून देते. आम्ही आता मोठे झालो आहोत, पण त्याच्या मनगटावर मी जी राखी बांधते, त्यात आजही तेच प्रेम, संरक्षण आणि लहानपणीच्या सुंदर आठवणी आहेत. तो माझ्यासाठी पित्यासारखा आहे- नेहमी मला मदत करणारा, माझ्या रक्षणाची चिंता करणारा. फक्त माझ्याकडे बघूनच त्याला काहीतरी बिनसले आहे, हे समजते. मी देखील, तो जेव्हा तणावात दिसतो, तेव्हा त्याला खुलवण्यासाठी सगळे प्रयत्न करते. आता तो स्वत: पिता झाला आहे, त्याच्या मुलांकडे बघताना मला गंमत वाटते. त्याचीच छोटी आवृत्ती जणू! ते देखील आमच्या राखी परंपरेत सामील होतात.



उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी शर्मा ही व्यक्तिरेखा साकारणारी आशी सिंह म्हणते, रक्षाबंधन हा सण माझ्यासाठी फार खास आहे. केवळ मला भाऊ आहे म्हणून नाही, तर मला तीन अद्भुत बहिणी देखील आहेत. आम्ही सगळे एकमेकांना चिडवतो, तयार होतो आणि इतकी भावंडे असल्यामुळे जो काही गोंधळ असतो त्यामुळे आमच्या घराचे रूपांतर सेलिब्रेशन झोनमध्ये होते. आम्हा सगळ्यांमध्ये भाऊ एकटाच आहे. त्यामुळे जितके त्याचे लाड होतात, तितकीच आम्ही त्याच्यावर दादागिरीही करतो. या वर्षी, मी त्याला आधीच सांगितले आहे की, यावेळी मला त्याच्याकडून काहीतरी विशेष भेटवस्तू हवी आहे, अजिबात आनाकानी चालणार नाही! आम्ही चॉकलेट्सपासून ते गुपितांपर्यंत सारे काही शेअर केले आहे.

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युगची भूमिका करणारा शब्बीर अहलूवालिया म्हणतो, रक्षाबंधन हा पहिल्यापासून माझा आवडता सण आहे. हा सण म्हणजे केवळ एक विधी नाही, तर नेहमी एकमेकांसोबत राहण्याचे ते वचन असते. आता मी आणि माझी बहीण शेफाली एका शहरात राहात नाही, पण आमच्यातील नाते अजून तितकेच मजबूत आहे. आम्ही पहिल्यापासून एकमेकांचे चीयरलीडर होतो. आमच्यातील अंतरामुळे यात काहीही फरक पडलेला नाही.

वीर हनुमान मालिकेत बाल हनुमानाची भूमिका करणारा आन तिवारी म्हणतो, साची दीदी आणि माझ्या नात्यात भरपूर प्रेम, हसू आणि खूप सारी गुपिते आहेत. मी नशीबवान आहे की ती माझ्या जीवनात आहे. ती माझ्यासाठी दुसऱ्या आईसारखीच आहे, नेहमी मार्गदर्शन देणारी, मला आधार देणारी आणि मी योग्य मार्गावर असल्याची खात्री करणारी. आणि मी? मी तिचा चीयरलीडर आणि संरक्षक आहे- माझ्यासमोर कुणीही तिच्याविषयी काही वावगे बोलू शकत नाही! ती जेव्हा नाराज असते, तेव्हा मी तिला घट्ट मिठी मारतो आणि तिला हसवण्यासाठी शक्य असेल ते करतो. माझ्यासाठी हाच राखीचा अर्थ आहे की, आमच्यातील या अतूट आणि निरपेक्ष नात्याचा आनंद साजरा करणे.

## राशीभविष्य

**मेष :** आज सावधगिरीने व्यवसाय करा. कोणत्याही प्रकारची जोखीम घेऊ नका. तुम्हाला शुभ सण इत्यादींबद्दल माहिती मिळेल. गोंधळ आणि चिंताची स्थिती राहील.

**वृषभ :** आज काम पूर्ण होण्यात अडथळे येतील. पण काही प्रयत्न केल्यानंतर परिस्थिती अनुकूल होऊ लागेल. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. पूर्वी प्रलंबित असलेले काही काम पूर्ण होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** आज तुम्हाला परीक्षा आणि स्पर्धेत यश मिळेल. तुमच्या मुलांची जबाबदारी पार पडेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या कुशल व्यवस्थापनाचे कौतुक होईल. व्यावसायिक मित्रांकडून पाठिंबा मिळेल.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी समस्या कमी होतील. सहकाऱ्यांसोबत सहकार्याचे वर्तन वाढवण्याचा प्रयत्न करा. नियोजित कामात यश मिळण्याची शक्यता आहे. समाजात तुमचे स्थान निर्माण करण्यात यशस्वी व्हाल.

**सिंह :** आज तुम्हाला अशा कामात यश मिळेल ज्याची तुम्ही खूप दिवसांपासून वाट पाहत होता. कामाच्या क्षेत्रातील समस्या शांततेने सोडवाव्या लागतील. कार्यक्षेत्राबाबत नवीन कार्य योजना बनवल्या जातील.

**कन्या :** खाजगी व्यवसायाशी संबंधित लोकांना व्यवसायात चढ-उतारांचा सामना करावा लागेल. उपजीविकेच्या क्षेत्रात, लोकांनी त्यांच्या कार्यक्षेत्राबद्दल अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे.

**तुळ :** नोकरीत उच्च अधिकाऱ्याशी तुमची जवळीक वाढेल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला मोठे आणि महत्त्वाचे यश मिळेल. आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. तुमचा राग नियंत्रित करा.

**वृश्चिक :** आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी संघर्ष करावा लागेल आणि कठोर परिश्रम करावे लागतील. लहान सहलीला जाण्याची शक्यता जास्त असेल. समन्वय साधण्याची आवश्यकता असेल.

**धनु :** आज तुम्ही राजकारणात वर्चस्व गाजवाल. तुम्हाला एखादा जुना मित्र भेटेल. कोणतेही महत्त्वाचे काम पूर्ण सतर्कता आणि सावधगिरीने करा. अन्यथा काम बिघडू शकते. मित्र व्यवसायात मदत करतील. मकर : तुम्हाला नोकरीत बढती मिळेल आणि तुमच्या इच्छेनुसार काम करण्याची संधी मिळेल. तुमच्या कौटुंबिक जीवनातील तणाव संपेल. तुम्ही मित्रांसोबत पर्यटनाचा आनंद घ्याल.

**कुंभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्रित परिणामांचा असेल. तुमचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करा. तुमची महत्त्वाची कामे इतरांवर सोपवू नका.

**मीन :** एखादा विश्वासू व्यक्ती व्यवसायात तुमची फसवणूक करू शकतो. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. नकोसा प्रवास करावा लागेल. आज कुटुंबात एक शुभ घटना घडेल.

# रॉयल स्टॅग बूमबॉक्स सादर करत आहे मेबी हे बूमबॉक्स ओरिजिनल गाणं

**गुरुग्राम, ७ ऑगस्ट :** रॉयल स्टॅग बूमबॉक्स हे युनिव्हर्सल म्युझिक ग्रुपच्या सहकार्याने साकारलेलं ब्रँडचं प्रमुख म्युझिक आयपी, आता रॉयल स्टॅग बूमबॉक्स ओरिजिनल्सअंतर्गत नव्या गाण्यांच्या मालिकेसह परतलं आहे, हा एक अनोखा फॉरमॅट आहे, जो मेलडी आणि हिप-हॉपचा संगम घडवतो. पहले जैसी बात नहीं, हूडी, मोहब्बत आणि इम्तिहान यांसारख्या यशस्वी ट्रॅक्सनंतर, या हंगामातील तिसरं ओरिजिनल गाणं मेबी सादर करण्यात आलं आहे, ज्यामध्ये अरमान मलिक आणि इक्का यांची दमदार जोडी एकत्र येत आहे.

गेल्या तीन वर्षांत विविध युवक केंद्रांमध्ये उर्जा आणि उत्साहाने भरलेल्या थेट कार्यक्रमांद्वारे प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केल्यानंतर, रॉयल स्टॅग बूमबॉक्स पुन्हा एकदा आपल्या दुसऱ्या सिझनसह परतले आहे, बूमबॉक्स ओरिजिनल्सचे हे साउंडट्रॅक्स ब्रँडच्या लिव्हिंग ईट लार्ज या आत्म्याचा उत्सव साजरा करतात. भारताच्या संगीतविश्वाला नव्याने आकार देत, हे व्यासपीठ संगीताच्या शैली, आवाज आणि संस्कृती यांचं सुंदर मिश्रण करून द ओरिजनल साउंड ऑफ जनरेशन लार्ज निर्माण करत आहे.

या गाण्यामागील प्रेरणेबद्दल बोलताना गायक अरमान मलिक म्हणाले, प्रामाणिक, भावनिक आणि प्रेमातल्या अनिश्चिततेच्या भावनेला स्पर्श करणारं मेबी हे गाणं खऱ्या अर्थाने हृदयातून आलेलं आहे. इक्कासोबत काम करताना गाण्यात एक नवीन ऊर्जा आणि वेगळी दिशा मिळाली. आम्ही एकत्र मिळून जे काही तयार केलं आहे, त्याचा मला खूप अभिमान आहे. रॉयल स्टॅग बूमबॉक्ससारखी व्यासपीठं कलाकारांना प्रयोग करण्याची, सीमा ओलांडण्याची आणि प्रेक्षकांशी खऱ्या अर्थाने जोडणं शक्य करून देतात, ही गोष्ट खूपच प्रेरणादायी आहे.

रॅपर इक्का यांनी या सहकार्याबद्दल आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, 'मेबी हे केवळ एक प्रेमगीत नाही, ती एक भावना आहे, एक असा विचार आहे की आयुष्यातील चांगले क्षण थोडे अधिक वेळ टिकवता आले असते तर किती बरं झालं असतं. अरमानसोबतच्या सहकार्यामुळे मला माझ्या संगीताचा एक सौम्य आणि अधिक आत्मचिंतनशील पैलू शोधण्याची संधी मिळाली. रॉयल स्टॅग बूमबॉक्सने कलाकारांसाठी एक असं व्यासपीठ तयार केलं आहे जिथे ते खरी प्रयोगशीलता आणि स्वत:ला मनापासून व्यक्त करू शकतात आणि हीच गोष्ट या सहकार्याला विशेष बनवते.

परनोड रिकार्ड इंडियाचे चीफ मार्केटिंग ऑफिसर आणि ग्लोबल बिझनेस डेव्हलपमेंट प्रमुख कार्तिक मोहिंद्रा म्हणाले, संगीत ही एक अशी सार्वत्रिक भाषा आहे, ज्यामध्ये माणसांना एकत्र आणण्याची आणि जादूई क्षण निर्माण करण्याची विलक्षण ताकद आहे. रॉयल स्टॅग युवकांमधील संगीताच्या आवडीचा सतत उत्सव साजरा करत आला आहे. रॉयल स्टॅग बूमबॉक्स ओरिजिनल्सद्वारे आम्ही हा अनुभव अधिक उंचीवर नेण्याच्या तयारीत आहोत, बॉलिवूडच्या सुरेल मेलडी आणि हिप-हॉपच्या जोशपूर्ण बीट्स यांचं संगम साधत, लिव्हिंग ईट लार्ज या ब्रँड तत्त्वज्ञानाचं खरं प्रतिबिंब सादर करत आहोत.

या सहकार्याबाबत भाष्य करताना प्रीती नायर, सीनियर व्हाइस प्रेसिडेंट आणि बिझनेस हेड, इंडिया अँड साउथ आशिया, यूएमजी फॉर ब्रँड्स म्हणाल्या, रॉयल स्टॅग बूमबॉक्स हे धाडसी अभिव्यक्तीचं आणि सर्जनशील स्वातंत्र्याचं प्रतीक आहे, जे परिचित संगीतापलीकडे जाऊन काहीतरी नवीन शोधण्याची प्रेरणा देतं. यूएमजी फॉर ब्रँड्समध्ये आम्हाला अशा व्यासपीठाचा भाग असल्याचा




अभिमान आहे, जे कलाकारांना प्रयोग करण्यासाठी, संगीताच्या विविध शैली एकत्र गुंफण्यासाठी आणि युवकांशी थेट संवाद साधण्यासाठी योग्य जागा उपलब्ध करून देतं. रॉयल स्टॅग बूमबॉक्स ओरिजिनल्स सातत्याने विविध संगीतविश्वातील अद्वितीय आवाज एकत्र आणत आहे आणि त्यांना संस्मरणीय सहकार्यांमध्ये रूपांतरित करत आहे. हे भारतातील बदलत्या संगीत प्रवाहाचं खऱ्या अर्थाने प्रतिबिंब आहे.

# रक्षाबंधन : विविधरंगी राख्यांनी बाजारपेठ फुलली

**अकोला :** स्नेह आणि बहीण- भावाच्या नात्याचा प्रतीक असलेला रक्षाबंधन सण ९ ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर अकोल्यातील बाजारपेठा विविध राख्यांनी सजल्या असून, खरेदीसाठी मोठी गर्दी उसळली आहे. कॉटन मार्केट, गांधी मार्केट, जयहिंद चौक, टॉवर चौक या परिसरात बहिणींसह कुटुंबियांची वदर्ळ दिसून येत आहे.यंदा राख्यांमध्ये विविधता आणि आधुनिकतेचा संगम पाहायला मिळत असून, सर्व वयोगटातील भावंडांसाठी राख्या उपलब्ध आहेत. छोटा भीम, डोरेमॉन, पोकेमॉन, स्पायडरमॅन, मोटू- पतलू यांसारख्या कार्टून राख्यांना लहान मुलांमध्ये विशेष क्रेझ आहे. त्याचबरोबर लायटिंग राख्या, रुद्राक्ष, क्रिस्टल आणि ब्रासलेट प्रकारांच्या स्टायलिश राख्यांनाही

मोठी मागणी आहे. ऑनलाइन ट्रेंडचा प्रभाव यंदा बाजारात प्रकर्षाने जाणवत असून, कलकत्ता व अहमदाबादहून आलेल्या खास कलाकुसरीच्या राख्या ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. बाजारात बहिणींसोबत त्यांच्या पतींचीही बाजारात उपस्थिती दिसून येत आहे. पुरोहितांच्या म्हणण्यानुसार, यंदा पंचांगानुसार रक्षाबंधन सणाच्या दिवशी राखी बांधण्याची शुभ वेळ दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत असल्याचे सांगण्यात येत आहे; मात्र प्रत्येक व्यक्तीची श्रद्धा, परंपरा आणि वेळेचा विचार करून राखी बांधण्याचा निर्णय घेतला जातो. दरम्यान, अकोल्यातील बाजारपेठांमध्ये रक्षाबंधनानिमित्त उत्सवी वातावरण निर्माण झाले असून, हाती राखी, चेहऱ्यावर आनंदाचे स्मित आणि मनात भावंडांप्रती प्रेम असा भावनांचा सुंदर मिलाफ शहरभर पाहायला मिळत आहे.यंदा कार्टून व लायटिंग राख्यांना खूप मागणी आहे.

# शाश्वत शेती विकासासाठी कृषि विद्यापीठाच्या चतुसूत्रीचा अवलंब करा: कुलगुरू डॉ. शरद गडाख

**■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
कधीकाळी अन्नधान्यांसाठी इतर राष्ट्रांवर अवलंबून असलेल्या आपल्या देशात भारतरत्न जेष्ठ कृषि शास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी गहू आणि धान पिकांची उत्पादकता व वाढीसाठी केलेल्या संशोधना मुळे स्वयंपूर्णता आली असून आज कृषी वैज्ञानिकांच्या निरंतर संशोधनामुळे १४२ कोटी लोकसंख्येला पुरेसं सकस अन्नधान्य उपलब्ध करत निर्यात धोरण राबविण्यापर्यंत शेती क्षेत्राने मजल मारल्याचे गौरवशाली प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.

हरितक्रांतीचे प्रणेते भारतरत्न प्रा. एम एस स्वामीनाथन यांच्या कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीला अभिवादन म्हणून त्यांच्या जन्म शताब्दी जयंतीच्या अवचित्याने त्यांचा जन्म दिन ७ ऑगस्ट हा दरवर्षी शाश्वत शेती दिन म्हणून साजरा करण्याच्या राज्य सरकारच्या धोरणाला सकारात्मक प्रतिसाद देत कृषि विद्यापीठाने राज्य शासनाच्या कृषी विभाग आणि प्रकल्प संचालक आत्मा यांचे संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती दिन कार्यक्रमाचे




आयोजन केले होते. कृषी महाविद्यालय, अकोलाच्या स्व. के.आर. ठाकरे सभागृहात आयोजित भारतरत्न डॉ. स्वामीनाथन यांची जयंती 'शाश्वत शेती दिन' कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानावरून उपस्थित शेतकरी अधिकारी विद्यार्थी विद्यार्थिनींना संबोधित करताना ते बोलत होते. काळ सुसंगत फायदेशीर व्यावसायिक शेती तंत्रज्ञानावर डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने भरीव कार्य केले असून शेतकरी बांधवांनी आपल्या गरजेनुसार सदर पिकवाण, तंत्रज्ञान शिफारसी, यंत्र-अवजारांसह बी -बियाणे तथा इतर कृषी निविष्ठांच्या प्रभावी वापरातून उत्पादन खर्चात बचत, उत्पादकता वाढीसह उत्पादन ते विपणन कृषी प्रक्रिया साखळीच्या चतुसूत्रीचा वापर करीत खऱ्या अर्थाने शाश्वत शेतीसह आर्थिक संपन्न ग्राम विकासाची संकल्पना कृतीत आणावी असे आवाहनही कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी आपल्या अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले व विद्यापीठाच्या शेती आणि शेतकरी हिताच्या विविध उपक्रमांना आवर्जून भेटी देत मॉडेल व्हिलेज योजना, शेतकरी शास्त्रज्ञ मंच, कृषि निविष्ठा विक्री केंद्राची संकल्पना देखील समजून घेतं संपन्नता साधावी असे आवाहन केले.

### तेल्हारा शहरातील मोकाट जनावरांना लम्पीची लागण

**■तेल्हारा,दि ६ (प्रतिनिधी) :**
शहरात दिवसेंदिवस मोकाट जनावरांची संख्या वाढत होत असून या जनावरांना लम्पी आजाराने ग्रासले असल्याचे दिसून येत आहे.मात्र मोकाट फिरणाऱ्या जनावरांचा पालिकाकडून बंदोबस्त करण्यास चालढकल सुरू आहे. तेल्हारा शहरात गल्लोगल्ली मोकाट जनावरांचा अक्षरक्षः हैदोस सुरू आहे. काही नागरिकही आपल्या पाळीव जनावरांना शहरात सोडत असल्याने या मोकाट जनावरांमध्ये विक्रमी वाढ झाली आहे. भररस्त्यात या जनावरांचे शेवेच्या थवे दिसून येतात. त्यामुळे या मोकाट जनावरांपासून नागरिकांच्या जीवालाही धोका निर्माण झाला आहे. त्याबरोबर यातील काही जनावरांना लम्पीची लागणसुद्धा झालेली आहे. लम्पीची लागण झालेली जनावरे नेमकी कुणाची,याबाबत पशुधन विकास अधिकाऱ्यांना माहिती नसल्याने यांच्यावर उपचार करताना दिसत नाही. याबाबत पालिका प्रशासनाने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे.

# पत्रकारांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ पातूर तालुका मराठी पत्रकार संघाचे
## तहसीलदार यांचे मार्फत पोलिस अधीक्षकांना निवेदन



**■पातुर,दि ६ (प्रतिनिधी) :**
अकोल्यात नुकत्याच घडलेल्या एका अत्यंत गंभीर आणि लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेल्या थेट हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने ७ जुलै २०२५ रोजी पातुर चे तहसीलदार यांचेमार्फत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. अकोला पोलीस अधीक्षक कार्यालयात पत्रकारांनी जनसंपर्क अधिकाऱ्याला विचारलेल्या प्रश्नांवर आधारित बातमी 'दैनिक सुफा' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीमुळे नाराज झालेल्या काही व्यक्तींनी थेट 'दैनिक सुफा'च्या कार्यालयात येऊन मुख्य संपादक सज्जाद हुसेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला केला व . त्यांना जीवे मारण्याची धमकी देत मारहाण करण्यात आली. ही घटना केवळ एका व्यक्तीवर नाही.

तर पत्रकारितेवर आणि लोकशाही मूल्यांवर झालेला हल्ला आहे.या घटनेच्या निषेधार्थ, मराठी पत्रकार संघटनेच्या पातुर तालुका वतीने पातूर येथील तहसीलदार डॉ. राहुल वानखेडे यांच्या माध्यमातून अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये हल्लेखोरांवर तातडीने कठोर कारवाई करावी. संपादक आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पोलिस संरक्षण द्यावे.

# डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांचा जयंतीनिमित्त 'शाश्वत शेती दिन' दधम येथे साजरा

**■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
भारताच्या हरितक्रांतीचे जनक, शेतकऱ्यांचे मार्गदर्शक डॉ. एम.एस.स्वामीनाथन यांचा जन्मदिवस ७ ऑगस्टला असतो. यावर्षी त्यांच्या १००व्या जयंतीचे औचित्य साधून राज्य शासनाने हा दिवस'शाश्वत शेती दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार बाळापुर तालुक्यातील मौजे दधम येथे जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मंडळ कृषी अधिकारी राहुल शिरसाट,आत्मा यंत्रणाचे तालुका तंत्र व्यवस्थापक व्ही व्ही.एम.शेगोकार,विषयतज्ञ अभिजीत वंजारे, सहायक कृषी अधिकारी कु.ए एस निलखन, कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.एम एस. स्वामीनाथन यांच्या प्रतिमेचे हारअर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर



उपस्थित शेतकऱ्यांना मंडळ कृषी अधिकारी राहुल शिरसाठ यांनी हरितक्रांती'तील योगदान डॉ.स्वामीनाथन यांनी गहू आणि तांदळाच्या उच्च उत्पादन देणाऱ्या वाणांचा विकास आणि प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

### तेल्हारा तालुका सहकार नेत्याकडून डॉ.कोरपेंचा सत्कार

**■तेल्हारा,दि ६ (प्रतिनिधी) :**
अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोष कोरपे यांना दि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह बँक असोसिएशन ली. मुंबई द्वारा दिला प्रतिष्ठेचा. विष्णुअण्णा स्टेट पाटील जीवन गौरव पुरस्कार मिळाला आहे. त्याबदल त्यांचा तेल्हारा तालुका सहकार नेत्यांनी त्यांच्या अकोला येथील निवासस्थानी जाऊन शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात केला. यावेळी सहकार नेते प्रा. सुधाकर येवले, प्रा. प्रदीप ढोले. पुंडलीकराव अरबट, शंकरराव ताथोड, दामोदर मार्के, कुलदीप तराळे, तेल्हारा कृउबासचे सभापती श्याम घोंगे, उपसभापती हरिदास वाघ, रवि बिहाडे, गौरव यादगिरे, सुनील इंगळे, उत्तमराव काकड आदी उपस्थित होते.

# करवाढ नोटिसवर आक्षेप घेण्याकरिता मुदतवाढ द्यावी

## अकोट नगरपालिकेला काँग्रेस कमिमटीचे निवेदन

**■अकोट,दि ६ (प्रतिनिधी) :**
अकोट पालिकेनेशहरातील मालमत्ता धारकांवर लादलेला प्रचंड वाढीवकर हा अन्यायकारक आहे. त्यातच पालिकेने वाढीव करावर आक्षेप दाखल करण्यासाठी नागरिकांना दिलेली मुदत अत्यंत कमी आहे. त्यामुळे आक्षेप दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी अकोट शहर काँग्रेसचे शहर अध्यक्ष सारंग मालाणी

यांच्या नेतृत्वात मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.निवेदनात म्हटले आहे की, अकोट पालिकेने करवाढ संदर्भात कलम ११९ कराची नोटीस अकोट वासियांना काही प्रमाणात वितरीत केली आहे. सदर नोटीसचे अवलोकन केले असता वाढीव कर आकारणीच्या विरोधात हरकत अर्ज दाखल करण्यासाठी ६/८/२०२५ पर्यंतच मुदत दिली आहे. परंतु अकोटच्या बऱ्याच प्रभागात



अद्यापपर्यंत नोटीस प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदर हरकतीची मुदत ही एक महिन्याने वाढवून देण्यात यावी,अकोट वासियांना हरकत दाखल कर करणे सोयीचे होईल. तसेच सदर हरकती सोबत नगरपरिषद मागील जबरदस्तीने भरून घेत आहे. वास्तविक मागील कर भरणा करण्याकरीता ३१ मार्च २०२६ पर्यंतची मुदत आहे. परंतु न.प. कोणताही कायदेशीर आधार नसतांनामागील कर जबरदस्तीने वसुल करीत आहे. तरी थकीत कर वसुल न करता हरकत अर्ज घेण्यात यावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# बाबूजी देशमुख वाचनालय लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धेत वत्सल प्रमोद देहानकर, हेमलता पवार प्रथम बक्षिसाची मानकरी

**■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
बाबूजी देशमुख वाचनालय अकोला चे वतीने लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त आयोजित शालेय वक्तृत्व स्पर्धेत 'लोकमान्य टिळकांचे जीवन व कार्य' या विषयावर आयोजित वक्तृत्व स्पर्धेत प्रभात किड्स स्कूलचा वत्सल प्रमोद देहानकर प्रथम पुरस्काराचा मानकरी ठरला तर महा विद्यालय गटात 'आजची राजनीति आणि लोकमान्य टिळक' या विषयावर आयोजित वकृत्व स्पर्धेत एल आर टी ची कु.हेमलता राजू पवार प्रथम बक्षीसाची मानकरी ठरली. बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार यांचे हस्ते विजेत्यांचा स्व. तुकारामपंत जोशी यांच्या स्मृती प्रित्यर्थ फिरती ढाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. शालेय गटातून द्वितीय क्रमांक- कु. तमन्ना शेख फिरोज ( जुबिली इंग्लिश स्कूल), तृतीय क्रमांक- कु. स्पृहा विकास फुलाने( स्कूल ऑफ स्कॉलर कौलखेड) तर



महाविद्यालयीन गटात द्वितीय क्रमांक-कु. निकिता अरुणकुमार दुबे (नथमल गोयंका लॉ कॉलेज अकोला) यांचा स्मृतिचिन्ह व बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. स्पर्धे चे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. विवेक हिवरे, एम.पी. मिश्रा, प्रा. बबनराव कानकिरड यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. मोहन खडसे यांनी केले. बाबूजी देशमुख वाचनालयाचे सचिव अनुराग मिश्र यांचे सह शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी, पालक, वाचक मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल सुरेश टेके, सहाय्यक ग्रंथपाल सतीश डगवाले, निर्गम सहाय्यक जुगल किशोर शिरसाठ, नितीन कदम, स्वप्निल राठोड, सुनील मिश्रा यांनी अथक परिश्रम घेतले.

# संतशिरोमणी सेना महाराज 'रिंगण' विशेषांकाचा प्रकाशन सोहळा

## 'रिंगण' प्रकाशन व सन्मान सोहळ्याचे आयोजन




**■अकोला,दि ६ (प्रतिनिधी) :**
संत परंपरेचा सामाजिक, सांस्कृतिक मागोवा घेणारा आषाढी-२०२५ निमित्त प्रकाशित होर्णाया 'रिंगण' च्या संतशिरोमणी सेना महाराज विशेषांक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन रविवार, दि. १० ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता कमिटी हॉल, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोला आणि डॉ. गिरीश गांधी फाऊंडेशन, नागपूर तर्फे करण्यात येत आहे.ज्येष्ठ पत्रकार सचिन परब यांनी हा अंक संपादित केला आहे. 'रिंगण' चे प्रकाशन आमदार श्री. अमोल मिटकरी यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शिक्षण संस्था चालक संघटनेचे अकोला जिल्हाध्यक्ष ॲड. विलास वखरे तर प्रमुख अतिथी म्हणून विदर्भ साहित्य संघ; शाखा अकोलाचे अध्यक्ष श्री. विजय कौसल आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य डॉ. गजानन नारे हे उपस्थित राहणार आहेत.

## थोडक्यात

### पारंपरिक पद्धतीने कावड यात्रा शांततेत पार पाडा!

**मूर्तिजापूर :** श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी शहरातील विविध मंडळांच्यावतीने शहरातील मुख्य मार्गाने विविध देखाव्यांसह कावड यात्रा काढण्यात येणार आहे. हा महोत्सव उत्साहात व शांततेत पार पाडण्याचे आवाहन आ. हरीश पिंपळे यांनी कावधारी व शिवभक्तांना केले.ते लाखपुरी येथे ४ ऑगष्ट रोजी आयोजित नियोजन बैठकीतून बोलत होते. डिजे न वाजविण्यावर आ. हरीश पिंपळे यांनी भर देत ध्वनीप्रदूषण होणार नाही याची काळजी मंडळानी घेण्याचे सांगितले. या धार्मिक कार्यक्रमात गैरप्रकार करणाऱ्यांची गय केली जाणार नसल्याचा सज्जड दम उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी यावेळी दिला. तालुक्यातील लाखपुरी येथील लक्षेश्वर संस्थान येथील पूर्णा नदी पात्रातील जल कावडीने खांद्यावर घेऊन महादेवाचा जलाभिषेक करण्याची प्रथा अनेक वर्षांपासून चालत आलेली आहे. या कावड महोत्सवात दर्यापूर, अंजनगाव, मूर्तिजापूर, कारंजा तालुक्यातून कावडरी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होत असतात. या सर्व तालुक्यातील शिवभक्तांच्या घेण्यात आलेल्या बैठकीत मूर्तिजापूरचे उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, शहर ठाणेदार अजित जाधव, ग्रामीण ठाणेदार श्रीधर गुट्टे व दर्यापूरचे ठाणेदार सुनील वानखडे यांनीही या बैठकीत कावड यात्रेत सुरक्षासंदर्भात कसे नियोजन राहिल, या विषयी मार्गदर्शन केले. बैठकीला दर्यापूर कावड मंडळाचे शिवाजी देशमुख, पत्रकार गजानन देशमुख, मूर्तिजापूर कावड मंडळाचे सचिन देशमुख, रामा हजारे, संजय गुप्ता, पत्रकार प्रा. दीपक जोशी, संजय उमक, विलास नसले, जयप्रकाश रावत, सुमित सोनोने, प्रतीक कुऱ्हेकर, गजानन गवई, धनराज सपकाळ, गौरव अग्रवाल, श्याम वाडसकर, लाखपुरीचे सरपंच राजेश कैथवास, ॲड. चंद्रजित देशमुख, त्रिलोक पंचारिया, ठाकूरदास अरोरा, बबलू ढोक, नाना मेहर यांच्यासह सर्वच विभागाचे अधिकारी उपस्थित होते. संचालन संस्थानचे अध्यक्ष राजू दहापुते तर आभार अतुल नवघरे यांनी मानले.

### बांधकाम कामगार संघटनेचा आझाद मैदानवर आक्रोश मोर्चा

**अकोला :** महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना स्वंतत्र कृती समीती व बिल्डींग पेंटर बांधकाम व इतर असंघटीत मजूर संघाचे वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर विवीध मागण्यासाठी 'आक्रोश मोर्चाचे' आयोजन करण्यात आले. अकोल्यातूनही आक्रोश मोर्चात सहभागी होणार असल्याचे निवेदन. सहाय्यक कामगार आयुक्तांना संघटनेतर्फे देण्यात आले . या आक्रोश मोर्चासाठी जिल्ह्यातून जास्तीत जास्त कामगारांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रसिध्द प्रमुख गणेश सावळे यांनी केले.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
------From--------
**JUGAL KISHOR TIKAMDAS GANDHI**
--------TO---------
**JUGALKISHOR TIKAMDAS GANDHI**
My Passport No Is - **F7338485**
My Residential Address is - Ward No 4 At. Post. Warwat Bakal Tq. Sangrampur Dist. Buldhana 444202

# ओम शांती सेंटरमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

**■तेल्हारा,दि ६ (प्रतिनिधी) :**
अकोल्यातील ओम शांती सेंटर या भक्ती स्थळी सोमवारी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात इंटरनेटचा सुरक्षित वापर, पासवर्डचे महत्त्व, फसवणूक टाळण्यासाठी उपाय, आणि सोशल मीडियावर दक्षता यासंबंधी उपस्थित भाविकांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला व क्विक हील, पुणे येथून आलेल्या सायबर वॉरियर्स सदस्य साक्षी फाटकर आणि हर्षा बिहाडे या वक्त्यांनी सायबर क्राईम कसे घडतात, कोणकोणत्या चुका केल्यामुळे फसवणुकीची शक्यता वाढते आणि त्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करता येईल, यावर सविस्तर आणि प्रभावी



मार्गदर्शन दिले.त्यांनी सांगितले की, ङ्गफसवणुकीच्या लिंक, फेक कॉल्स, फिशिंग ईमेल्स यामार्फत सामान्य व्यक्ती कशी अडचणीत येऊ शकते आणि त्यावर साधे पण प्रभावी उपाय कोणते आहेत, हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व, पासवर्ड मॅनेजमेंट, आणि ऑनलाईन व्यवहार करताना घ्यावयाची काळजी यावरही त्यांनी भर दिला.कार्यक्रमाचे आयोजन ओम शांती सेंटरच्या प्रमुख कु. वैष्णवी दीदी यांच्या नेतृत्वाखाली झाले. त्यांनी सांगितले की, ङ्गडिजिटल युगात अध्यात्मबरोबरच जागरूकतेची गरज आहे. प्रत्येक भाविकाने सायबर सुरक्षेच्या गोष्टी आत्मसात करणे आवश्यक आहे.या कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सेंटरच्या स्वयंसेवक आणि व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# अस्मिता

## रुचकर कोफ्ता करी

रसगंधा

मैत्रिणींनो, मटारपासून छान छान पदार्थ बनवता येतात. आज लज्जतदार कोफ्ते बनवून बघा.



**साहित्य :** मटारचे दाणे एक कप, दोन उकडलेले बटाटे, चमचाभर बेसन, किसलेलं आलं एक चमचा, दोन हिरव्या मिरच्या, मीठ इत्यादी.

**ग्रेवीसाठी :** तीन टोमॅटो, दोन हिरव्या मिरच्या, आलं, दोन चमचे तेल किंवा तूप, अर्धा चमचा जीरं, हळद, धनेपूड, गरम मसाला, दोन चमचे साय, चमचाभर तिखट, मीठ आणि कोथिंबिर

**कृती :** मटार उकडून रवाळ वाटा. बटाटे कुस्करून घ्या. कोफ्त्यासाठीचं साहित्य एकत्र करून गोळे करा. ते सोनेरी रंगाचे होईपर्यंत तळा. ग्रेवीसाठी हिरवी मिरची, टोमॅटो, आलं एकत्र वाटून घ्या. कढईत तेल किंवा तूप घालून हळद आणि धनेपूड घालून परता. वाटलेला टोमॅटो तेल सुटेपर्यंत परता. मसाल्यात साय घालून दोन मिनिटं शिजवून घ्या. मीठ, तिखट, गरम मसाला घाला. शिजवल्यावर थोडं पाणी घाला. पाणी उकळल्यावर यात कोफ्ते घाला. दोन मिनिटं शिजवून वरून कोथिंबिर घाला. मटार कोफ्ता करी तयार आहे.

## असे जपा केसांचे आरोग्य

सौंदर्यसाधना



पावसाळ्यात फक्त त्वचाच कोरडी पडते असं नाही तर केसही खराब होतात. वारंवार पावसात भिजल्याने केस निस्तेज दिसतात. या दिवसात कोंडा होण्याची शक्यता अनेकपटींनी वाढते. त्यामुळे पावसाळ्यात आठवड्यातून दोन वेळा तरी केस धुवायला हवेत. या काळात केसांचं सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी काय करता येईल याविषयी...

* खोबरेल किंवा बदामाचं तेल गरम करून केसांना नीट मसाज करा. आठवड्यातून एकदा तरी हा उपाय करा.

* या दिवसात केस ट्रिम करून घेणं गरजेचं आहे. वातावरणामुळे केस निस्तेज दिसू लागतात. त्यातच फाटे फुटल्यामुळे केस खूपच खराब दिसतात. त्यामुळे वरचेवर ट्रिम करून घेणं गरजेचं आहे. यामुळे केसांची वाढही चांगली होईल.

* शँपू लावल्यानंतर कंडिशनर वापरायला विसरू नका. कंडिशनरमुळे केस मुलायम होतील.

* या दिवसात रोज केस धुवू नका. दररोज शँपू वापरल्यामुळे केसांमधलं नैसर्गिक तेल नष्ट होतं. ते कोरडे दिसू लागतात. त्यामुळे आठवड्यातून दोन वेळा केस धुवा.

* पावसाळी हवेपासून केसांचा बचाव करा. यासाठी बाहेर जाताना केस स्कार्फने झाकून घ्या. केस फार घट्ट बांधू नका. सैलसर अंबाडा घाला किंवा केस क्लचरने बांधा.

## परतणार मूळ स्थानाकडे


मानिनी

भारतीय-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ असणाऱ्या गीता गोपीनाथ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये प्रथम उपव्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होत्या. जगातील मुख्य अर्थशास्त्रज्ञांच्या यादीमध्ये त्यांचा समावेश होतो. मात्र अलिकडेच त्यांनी आयएमएफमधून राजीनामा दिला आहे. गीता गोपीनाथ यांनी स्वत: ही घोषणा केली आणि आपण पुन्हा एकदा हार्वर्ड विद्यापीठाच्या फॅकल्टीमध्ये सामील होणार असल्याचे स्पष्ट केले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर पोस्ट करत त्यांनी लिहिले की, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये सात वर्षे घालवल्यानंतर मी माझ्या शैक्षणिक मुळांकडे परतण्याचा निर्णय घेतला आहे.

गीता गोपीनाथ एक सप्टेंबरपासून हार्वर्डच्या अर्थशास्त्र विभागात 'प्रोफेसर ऑफ इकॉनॉमिक्स' म्हणून सामील होतील. गीता म्हणतात की, आता मी शैक्षणिक क्षेत्रात परत येण्याची आणि आंतरराष्ट्रीय वित्त आणि मॅक्रोइकॉनॉमिक्समध्ये संशोधन पुढे नेण्यास तसेच अर्थशास्त्रज्ञांच्या नवीन पिढीला प्रशिक्षण देण्यास उत्सुक आहे. गीता गोपीनाथ यांनी जानेवारी २०१९ मध्ये आयएमएफमध्ये मुख्य अर्थतज्ज्ञ म्हणून पदभार स्वीकारला आणि जानेवारी २०२२ मध्ये त्यांना प्रथम उपव्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त केले. आयएमएफमध्ये त्यांनी जागतिक संकट ठरलेली कोविड महामारी, युद्ध, महागाई आणि व्यापारातील बदल यासारख्या अनेक कठीण काळामध्ये संघटनेच्या धोरणांचे दृढ नेतृत्व केले.

आयएमएफमध्ये सामील होण्यापूर्वी त्यांनी २००५ ते २०२२ पर्यंत हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून काम केले होते. तसेच २००१ ते २००५ दरम्यान त्या शिकागो विद्यापीठाच्या बूथ स्कूल ऑफ बिझनेसमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणूनही कार्यरत होत्या. काम केले.

आयएमएफच्या व्यवस्थापकीय संचालक क्रिस्टलिना जॉर्जिएवा यांनी गीता गोपीनाथ यांचे वर्णन एक उत्कृष्ट सहकारी, बौद्धिक नेता आणि समर्पित व्यवस्थापक असे केले आहे. गीताने केवळ विश्लेषणात्मक कठोरता दाखवली नाही तर आयएमएफमध्ये अत्यंत आव्हानात्मक काळात व्यावहारिक धोरणात्मक सल्लाहदेखील दिला, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यांच्या अचूक सल्ल्यामुळे कोविड, युद्ध, महागाई समस्या आणि जागतिक व्यापार व्यवस्थेतील मोठे बदल असतानाही अर्थघडी विस्कटली नसल्याचे मत या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्त करतात.



गीता गोपीनाथ यांनी दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि प्रिन्स्टन विद्यापीठातून शिक्षण घेतले आहे. सहाय्यक प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. आता त्या पुन्हा एकदा हार्वर्ड विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू होत आहेत. त्यांच्या पुढील कारकिर्दीला शुभेच्छा

## घाबरणे योग्य नाही

मी २७ वर्षांची महिला असून नुकतंच लग्न झालं आहे. माझं एका मुलावर प्रेम होतं. पण गेल्या वर्षी आमच्यात खूप वाद झाला आणि आम्ही ब्रेक अप केलं. यानंतर मी आईवडिलांनी पसंत केलेल्या मुलाशी लग्न केलं. मात्र आता माजी प्रियकर मला ब्लॅकमेल करू लागला आहे. पतीला आमच्या नात्याबद्दल सगळं काही सांगण्याची धमकी तो देतो. आम्ही एकमेकांच्या खूप जवळ आलो होतो. माझ्या आधीच्या नात्याची पतीला कल्पना आहे. पण आमच्या जवळीकीची त्याला अजिबात कल्पना नाही. याच कारणामुळे मी खूप घाबरले आहे. मी काय करू?



काय करू?

– पतीला तुझ्या आधीच्या नात्याबद्दल माहीत आहे. त्यामुळे तुला घाबरण्याचं काहीच कारण नाही. पती-पत्नीच्या नात्यात विश्वास महत्त्वाचा असतो. त्यामुळे पतीला विश्वासात घे. हा मुलगा तुला ब्लॅकमेल करत असल्याचं त्यांना सांग. तुझ्या माजी प्रियकराशी संपर्क साधून पतीला सगळ्या गोष्टींची कल्पना असल्याचं स्पष्टपणे सांग. यानंतर कोणत्याही परिस्थितीला सामोरं जाण्याची तयारी ठेव. माजी प्रियकराशी अजिबात संपर्क करू नकोस. गरज वाटल्यास समुपदेशकांचीही मदत घे. अजिबात घाबरू नकोस. सद्य परिस्थितीला तोंड दे.


## नेकपीस निवडताना...

स्टाईल स्टेटमेंट

ब्लाउज असो वा इव्हिनिंग गाऊन, किंवा मग सलवार कमीज, तुमचा लूक अधिक खुलवण्यासाठी मॅचिंग आणि योग्य ॲक्सेसरीज गरजेच्या असतात. प्रत्येक पेहरावाची नेकलाईन वेगळ्या प्रकारची असते. त्यामुळे नेकलाईनला साजेशा ॲक्सेसरीज आणि त्यातही नेकलेस असणं गरजेचं असतं. कोणत्या नेकलाईनवर कोणता नेकलेस शोभून दिसेल? जाणून घेऊ.

* डीप राउंड, स्क्वेअर किंवा बोट नेकच्या कपड्यांवर चोकर शोभून दिसतो. यामुळे कॉलर बोन अधिक उठावदार दिसतात आणि तुम्ही उंच दिसू लागता. चोकर घालणार असाल तर छोट्या आकाराचे लांबटे कानातले घाला. छोटे झुमकेही चालून जातील.

* राउंड नेक असणाऱ्या कपड्यांमध्ये तुमचे कॉलर बोन लपतात. त्यामुळे हाय राउंड नेक ब्लाउजवर नेकलेस घालण्याची गरज नाही. ब्रोकेडवाल्या ब्लाउजवर नेकलेस घालू नका. त्याऐवजी झुमके किंवा छानसं हेवी कानातलं कॅरी करा.



* डीप व्ही नेकवर छोट्या आकाराचा पण गळाभर नेकलेस छान दिसेल. पेंडटवाले नेकलेही शोभून दिसतील.

* गेल्या काही वर्षांपासून कॉलर नेक ट्रेंडमध्ये आहे. कॉलर नेक कुर्ते विविध प्रसंगी घालता येतील. कॉलर नेकवाले ब्लाउजही छान दिसतात. पण अशा पद्धतीच्या गळ्यावर काय घालायचं असा प्रश्न पडतो. तुमचा ब्लाउज ब्रोकेड मटेरियलचा असेल तर त्यावर नेकलेसची गरज नसते. पण प्लेन कॉलर नेक टॉप किंवा ब्लाउजवर लांब नेकलेस घालता येईल.


## मातांनो, काळजी घ्या

संगोपन

अलिकडेच जयपूर, बिकानेर आणि राजस्थानमध्ये २६ ते ४२ वर्षे वयोगटातील १०५ मातांच्या दुधाचे नमुने चाचणीसाठी घेण्यात आले होते. ही चाचणी मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत करण्यात आली. तेव्हा सर्व नमुन्यांमध्ये आईच्या दुधात बाळाच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरणारे अनेक हानिकारक पदार्थ आढळले.

खरे पाहता आईचे दूध हे बाळासाठी पोषणाचा सर्वोत्तम स्रोत आहे. त्यात पाणी, प्रथिने, कार्बोहायड्रेट्स, चरबी आणि आवश्यक एंजाइम असल्यामुळे बाळाला निरोगी ठेवण्यास मदत करतात. परंतु खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि पर्यावरणीय प्रदूषणामुळे आईच्या दुधात विषारी घटक आढळत असून ते बाळांना आजारी बनवू शकतात, असे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहेत.

तपासात आईच्या दुधात डिटर्जंट, युरिया, मेलामाइन, फॉर्मेलिन, सल्फेट आणि कीटकनाशके सारखे पदार्थ आढळले आहेत. बनावट प्रथिनांचे प्रमाण वाढवण्यासाठी दुधात डिटर्जंट आणि युरियासारखे घटक मिसळले जातात, जे बाळासाठी हानिकारक ठरतात. मेलामाइन हे दूध पावडर आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये आढळणारे एक रसायन आहे. त्यामुळे किडनी आणि पोटाचे आजार होऊ शकतात. मासे आणि भाज्या दीर्घकाळ ताजे ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्मेलिनचा आईच्या शरीरात प्रवेश होतो आणि दूध दूषित होते.



एकूणच खाण्याच्या चुकीच्या सवयी, प्रदूषित पाणी, कीटकनाशकांचा अतिवापर आणि प्रदूषित वातावरणामुळे अनेक विषारी पदार्थ तान्ह्या बाळांच्या शरीरात पोहोचत आहेत. अशा हानिकारक घटकांमुळे पोटाचे संसर्ग, अतिसार, उलट्या, किडनीचे आजार आणि बाळांमध्ये रोगप्रतिकारक शक्तीचा अभाव होऊ शकतो. हे लक्षात घेता मातांनी काळजी घेणे गरजेचे आहे. बाहेरून तळलेले किंवा अस्वास्थ्यकर अन्न खाणे पूर्णपणे बंद करावे. घर स्वच्छ ठेवावे, स्वच्छ पाणी वापरावे.

## स्वयंपाक, स्वत:ला ओळखण्याचा मार्ग

डाएट अँड न्यूट्रिशन

मैत्रिणींनो; स्वयंपाक करणं, तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ बनवणं ही एक कला आहे. काहींना स्वयंपाकाचा कंटाळा येतो किंवा रोजचा स्वयंपाक हे खूप अवघड काम वाटतं. पण प्रत्यक्षात स्वयंपाक करणं ही एक थेरपी आहे. यामुळे तुमचा ताण कमी होऊ शकतो. याला कलिनरी आर्ट थेरपी असं म्हणतात. चला तर मग, या थेरपीची माहिती घेऊ.

* राग आल्यावर किंवा खूप तणावात असताना आवडीचं खाण्याची इच्छा होते. अशा वेळी महिला एखादा पदार्थ बनवून खातात. यालाच कलिनरी आर्ट थेरपी असं म्हटलं जातं.

* स्वयंपाक केल्यामुळे तणाव कमी होतो. स्वयंपाक करताना चित्त एकाग्र होतं. महिलांचं लक्ष एकाच ठिकाणी केंद्रित झालेलं असतं. त्यामुळे मेंदूलाही चालना मिळते. मन एकाग्र व्हायला मदत होते.



* स्वयंपाक करताना विविध प्रकारचे मसाले वापरले जातात. मसाल्यांचा गंध तणाव कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. आपल्या आवडत्या पदार्थांचा गंध आल्यावर रागही कमी होतो.

* स्वयंपाक करता करता महिलांना स्वत:मधल्या कलागुणांची जाणीव होते. इतकंच नाही तर या दरम्यान महिला वेगवेगळे प्रयोग करतात. याच कारणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांची तीव्रता कमी होऊ शकते.

त्यामुळे आवड असेल तर बिनधास्त स्वयंपाक करा. स्वत:ही खा आणि कुटुंबियांनाही खाऊ घाला.

स्कीन केअर

### खुलवा चेहऱ्याचं सौंदर्य



चेहरा उजळवण्यासाठी घरीच साधा सोपा उपाय करता येईल. यासाठी चमचाभर तांदळाचं पीठ घ्या. प्रत्येकी एक चमचा दही आणि टोमॅटोचा रस घ्या. सर्व घटक एकत्र करा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. पाच मिनिटं मसाज करा. हा पॅक १५ ते २० मिनिटं चेहऱ्यावर लावा. कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा उपाय आठवड्यातून दोन वेळा केल्यामुळे चेहरा उजळेल.

स्मार्ट टिप्स


### दगडाने कमी करा लव



अंगावरची लव काढून टाकण्यासाठी वेगवेगळे उपाय केले जातात. वॅक्सिंगचा पर्याय निवडला जातो. काही महिला हेअर रिमूव्हिंग क्रीमचा वापर करतात. मात्र एका दगडाचा वापर करून नैसर्गिक पद्धतीने ही लव काढून टाकता येते. या दगडाला प्युमिस स्टोन असं म्हटलं जातं. प्युमिस स्टोनचा वापर करण्यासाठी हात किंवा पाय काही वेळ गरम पाण्यात बुडवून ठेवा. आता एका कंटेनरमध्ये गरम पाणी घ्या. त्यात थोडं खोबरेल तेल घाला. आता हा दगड या पाण्यात बुडवून ठेवा. यामुळे दगडाचा कठीणपणा कमी होईल. आता लव असणाऱ्या भागावर हा दगड हलक्या हातांनी फिरवा. लव गेल्याची खात्री करून घ्या.

नवा ट्रेंड

### शेडेड मेक अप करायचाय?



मेक अपचे वेगवेगळे ट्रेंड नेहमीच लोकप्रिय होत असतात. सध्या शेडेड मेक अपचा ट्रेंड लोकप्रिय होत आहे. यामुळे मेक अप केल्यानंतर चेहऱ्यावरचे रंग बदललेले दिसतात. सोशल मीडियावर फोटो पोस्ट करण्यासाठी अशा पद्धतीचा मेक अप केला जात आहे. त्यातच रात्रीच्या पार्टीसाठी असा मेक अप करण्याला प्राधान्य दिलं जात आहे. त्यामुळे तुम्हीही शेडेड मेक अपचा हा ट्रेंड फॉलो करू शकता.

## नागपुरातील व्यापारी संघटनांचा

# परदेशी वस्तूंवर बहिष्कार

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा स्वदेशीचा नारा टिळक पुतळा चौकात आज अभिनव उपक्रम



**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर मोठे कर लावण्याचे घोषित केले आहे. त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अद्याप थेट भाष्य केले नाही. दरम्यान पंतप्रधानांनी नुकतेच स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याचे आवाहन एका कार्यक्रमात केले होते. त्याला प्रतिसाद देत भारतातील कॅट या व्यापारी संघटनेने ८ ऑगस्टला नागपुरात एक उपक्रमाची घोषणा केली.

व्यापाऱ्यांच्या या उपक्रमात स्वदेशी जागरण मंचही सहभाग घेणार आहे. या विषयावर कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळकृष्ण भारतीय म्हणाले की, भारताला समृद्ध, सुरक्षित, स्वावलंबी, स्वाभिमानी आणि प्रेरणादायी राष्ट्र बनवण्यासाठी परदेशी वस्तूंवर बहिष्कार घपण्याची गरज आहे. या महान मोहिमेच्या धर्तीवर, टीम कॅट नागपूर आणि स्वदेशी जागरण मंच यांच्यासोबत ८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता नागपुरातील गांधी सागर येथील टिळक पुतळा चौकात परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये व्यापाऱ्यांसह ग्राहकाचीही उपस्थिती राहणार आहे.

दरम्यान कॅट व्यापाऱ्यांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच संसदेला भेट दिली होती. त्यात देशभऱ्यातील १५० प्रमुख व्यावसायिक नेत्यांचा समावेश होता. संसद सदस्य आणि कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) चे राष्ट्रीय महासचिव प्रवीण खंडेलवाल यांच्या नेतृत्वाखाली ही भेट होती.

यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसद संकुलातील त्यांच्या बैठकीच्या खोलीत कॅट व्यापाऱ्यांना संबोधित केले. यावेळी बिर्ला म्हणाले, व्यापारी आणि व्यापार हे देशाचा कणा आहेत. व्यापारी केवळ रोजगार निर्माण करत नाहीत तर देशाच्या अर्थव्यवस्थेला पुढे नेण्यातही महत्त्वाची भूमिका बजावतात. बदलत्या आर्थिक वातावरणाला लक्षात घेऊन व्यापाऱ्यांना त्यांचा स्तर वाढवावा लागेल. आपण सर्वांनी स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संदेश पुन्हा सांगितला आणि म्हटले की व्यापाऱ्यांनी आता देशाच्या आणि स्वतःच्या हितासाठी स्वदेशी वस्तू विकल्या पाहिजेत आणि खरेदी केल्या पाहिजेत.

कॅटचे राष्ट्रीय सरचिटणीस प्रवीण खंडेलवाल म्हणाले, देशातील व्यापारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. भारतीय वस्तू खरेदी आणि विक्रीह करण्याच्या त्यांच्या आवाहनाला आम्ही पूर्ण पाठिंबा देतो. त्यानुसार देशभरात स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी देशव्यापी मोहीम सुरू केली जाईल. ही मोहीम स्वावलंबी भारत निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

## महासागर अधिक लोकाभिमुख करणार

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :**

दैनिक महासागर वृत्तपत्र समुहाच्यावतिने येथील माहेश्वरी भवनात आयोजित करण्यात आलेल्या अर्धवार्षिक संमेलनात महासागर, युवाराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट या दैनिकाच्या राज्यभरातून आलेले प्रतिनिधी, विदर्भातील आवृत्त्यांचे स्थानिक संपादक तसेच मुंबई, नाशिक आणि पालघर येथील आवृत्ती प्रमुखांनी त्यांच्या पत्रकारितेच्या प्रवासातील अनुभव कथन केले. आदर्श आणि तत्वांशी कोणतीही तडजोड न करता, त्यांना असलेले लिखाणाचे स्वातंत्र्य याचा उल्लेख करीत महासागर आणि समुहातील इतर वर्तमापत्रांना अधिकाधीक लोकाभिमुख करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते झालेल्या सन्मानाने प्रतिनिधी भारावून गेल्याचे दिसून आले.



मागील सहा महिन्यात सर्वाधिक जाहिरात व्यवसाय केल्याबद्दल युवाराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट या दैनिकाचे गोंदिया प्रतिनिधी मुकेश मिश्रा यांना प्रथम पुरस्कार देवून गौरविण्यात आले.



## गळफास लावून तरूण शेतकऱ्याची आत्महत्या



**■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ७ :**

जंगली जनावरांमुळे पिकाचे नुकसान आणि कर्जबाजारीपणामुळे एका ३० वर्षीय तरूण शेतकऱ्याने विषप्राशन करून आत्महत्या केली. ही घटना घाटंजी तालुक्यातील भांबोरा येथे घडली असून सागर लक्ष्मण पुसनाके मृतकाचे नाव आहे.

पुसनाके यांचे पिकांचे वन्यप्राण्यामुळे नुकसान होत होते. शिवाय, त्याच्यावर कर्ज होते. यामुळे मानसिक तणावात असलेला सागर याने आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील असा परिवार आहे.

## स्टंटचे प्रताप आणि स्पॉन्सरशिप

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ७ :**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन महायुती मधील तणाव कमी करण्याचा प्रयत्न करत असताना शिंदे सेनेचा पुन्हा एक मंत्री अडचणीत येतोआहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक स्टंटचे प्रताप करून रॅपिडोची स्पॉन्सरशिप मिळवल्याचा आरोप होत आहे. यासंदर्भात काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी एक्स वर पोस्ट केली आहे.

परिवहन मंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे, की त्यांनी आपल्या इव्हेंटसाठी पैसे कसे उभे करायचे याचा डेमो महाराष्ट्र सरकारला दाखवला.आधी एका खासगी ॲपवरून बाईक बुक करायची मग गरीब बिचाऱ्या बाईकवाल्याला पकडायचे, ॲपवरून बाईक चालवणे नियमबाह्य आहे असा स्टंट करायचा, त्याचे व्हिडिओ बनवून परिवहन मंत्री किती स्मार्ट आणि अलर्ट आहेत असा पीआर करायचा, स्वतःची इमेज बिल्डिंग करायची, आणि मग अडचणीत आलेल्या या खासगी ॲपवाल्यांकडून इव्हेंटसाठी निधी मिळवायचा, किती छान आयडिया आहे ना, महाराष्ट्राच्या तिजोरीत खडखडाट असताना निधी कसा उभा करायचा, याचा आदर्शच प्रतापी मंत्र्यांनी घालून दिला.

इव्हेंटसाठी पैसे उभे करायचे असेल तर मंत्र्यांना काय काय करावे लागते आहे. राज्याची आर्थिक स्थिती पाहता येणाऱ्या काळात विविध खात्यातील मंत्र्यांना देखील अशीच स्टंटबाजी करावी लागेल, असं चित्र आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

## त्यांची मस्तीच जिरवायची आहे...

### माजी मंत्र्यांचे विधान : शिंदेसेना-भाजप वाद विकोपाला


**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

महाराष्ट्रात पुढच्या काही महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. यात महायुती आणि आघाडीमधील पक्ष एकत्रपणे लढणार की, स्वतंत्रपणे ते अजून स्पष्ट नाही. मात्र, निवडणुकीपूर्वीच भाजपा आणि शिंदेसेनेमधील वाद पेटू लागला आहे.

नंदूरबारमधील भाजपाचे वजनदार नेते डॉ. विजयकुमार गावित यांनी पुन्हा शिंदे गटाच्या आमदारांवर निशाणा साधला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत माझे फक्त दोनच टार्गेट आहेत, एक आमदार चंद्रकांत रघुवंशी तर दुसरा आमदार आमश्या पाडवी. शिंदे गटाच्या आमदारांची मस्ती जिरवायची आहे, असे डॉ. विजयकुमार गावित म्हणाले. आमश्या पाडवी यांच्याकडे बारा बंगले आहेत, तर त्यांच्या पत्नीकडे चार बंगले आहेत, तरी देखील पंतप्रधान घरकुल योजनेच्या लाभ घेतला आहे, असेही डॉ. गावीत म्हणाले.

: सिनेरंग :

## राजवीरच्या निमित्ताने सुहास खामकरचे हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण




लोकरंजन

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या सुप्रसिद्ध बॉडीबिल्डर सुहास खामकर यांची प्रमुख भूमिका असलेला राजवीर हा आगामी हिंदी चित्रपट आज संपूर्ण भारतात प्रदर्शित होण्यास सज्ज झाला आहे. बलदंड व्यक्तिमत्त्व असलेल्या सुहास खामकरच्या रुपानं चित्रपटसृष्टीला नवा नायक या चित्रपटाच्या माध्यमातून मिळणार आहे.

अर्थ स्टुडिओ यांनी सारा मोशन पिक्चर्स आणि रुचिका तोलानी प्रॉडक्शन्स, समृद्धी मोशन पिक्चर्स यांच्या सहकार्यानं राजवीर चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. साकार प्रकाश राऊत, ध्वनि साकार राऊत, गौरव परदासनी, सूर्यकांत बाजी चित्रपटाचे निर्माते, तर रुचिका तोलानी सूचक सहनिर्मात्या आहेत. साकार राऊत, स्वप्नील देशमुख यांनी चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे.

चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन साकार राऊत, जेकॉब आणि पॉल कुरियन, माज खान यांनी केलं आहे.

भूषण वेदपाठक यांनी छायांकन, अभिनंदन गायकवाड, होपून सैकिया यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. चित्रपटात सुहास खामकरसह झाकीर हुसैन, गौरव परदासनी, प्राशी अवस्थी, धीरज सानप यांच्या प्रमुख भूमिका आहेत. राजवीर या चित्रपटात एका आयपीएस अधिकाऱ्याची गोष्ट दाखवण्यात आली आहे.

अत्यंत तडफदार व्यक्तिमत्त्व असलेल्या सुहासनं राजवीर ही भूमिका साकारली आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये सुहास खामकर अर्थातच राजवीरचा दमदार अभिनय दिसतो आहे. चित्रपटाचा ट्रेलर आणि सुहास खामकरचं तडफदार व्यक्तिमत्त्व पाहूनच चित्रपटाविषयी आता चांगलीच उत्सुकता निर्माण झाली आहे.

■ ■ ■

टीव्हीच्या पडद्यावर सांस्कृतिक क्षण उलगडणाऱ्या, स्टार प्लस या वाहिनीने भारतीय सण भव्यतेने आणि भावनेचा स्पर्श देऊन साजरे करण्याची आपली परंपरा चालू ठेवली आहे.

यंदा रक्षाबंधनाच्या निमित्ताने ही वाहिनी स्टार परिवार बहन का ड्रामा, भाई का स्वॅग नावाने एक मनोरंजक चमकदार प्रहसन सादर करणार आहे, ज्यामध्ये नाट्य, डान्स आणि भावंडांच्या प्रेमाची भावना ओतप्रोत असेल. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या या प्रोमोमध्ये स्टार कलाकारांनी नटलेल्या या प्रहसनाची झलक बघायला मिळत आहे. या रजनीची होस्ट आहे अनुपमा. यात ये रिश्ता क्या कहलाता है मालिकेतील अरमान आणि अनुपमा मधील प्रेम यांच्यात एक अनपेक्षित आणि जोरदार टक्कर होणार आहे. हे दोन्ही कलाकार आपल्या दमदार परफॉर्मन्सने मंच दणाणून सोडतील आणि झनकचा भाऊ बनण्याचा सन्मान मिळवण्यासाठी कटिबद्ध दिसतील.

रक्षाबंधनाच्या वातावरणात भाऊ असण्याची जी गौरवपूर्ण भावना असते, त्याच्या अनुरोधाने या दृश्याचे सर्जन कलात्मकतेने करण्यात आले आहे. नाट्यमयता आणि जोरदार कोरिओग्राफीसह हे दोघे स्पर्धक या परफॉर्मन्समध्ये आपली खास शैली आणि आपले अनोखे व्यक्तिमत्व घेऊन येतील. हा ॲक्ट पाहताना एक प्रश्न प्रेक्षकांच्या मनात उद्भवेल की, झनकचा भाऊ म्हणून सरतेशेवटी कुणाची निवड होणार?

गंमतीशीर कथानकातील खेळकर चढाओढ आणि अनपेक्षित कलाटण्या प्रेक्षकांची उत्कंठा वाढवतील.पहात रहा, स्टार परिवार बहन का ड्रामा, भाई का स्वॅग ९ ऑगस्टला रात्री ७ वाजता, केवळ स्टार प्लसवर.

■ ■ ■




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com




# सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स: एकात्मिक शिक्षणदृष्टीकोनातून २१व्या शतकातील उद्योजकांचे घडवणार प्रेरणास्थान

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत ७ फेब्रुवारी १९९९ रोजी स्थापन झालेल्या सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, पुणे ही संस्था यंदा अभिमानाने २७ वर्षांचा यशस्वी शैक्षणिक प्रवास साजरा करत आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळात गुणवत्ता, नवकल्पना आणि सामाजिक बांधिलकीची प्रतीक बनली आहे, जी विद्यार्थ्यांना २१व्या शतकातील गरजांसाठी सक्षम बनवते.

विद्यार्थ्यांचे करिअर समृद्ध करणे, समग्र, बौद्धिक आणि शाश्वत विकासासाठी जीवन वाढवणे' हे संस्थेचे ब्रीदवाक्य, मूल्याधिष्ठित, व्यावसायिक आणि समग्र शिक्षणाच्या साक्ष आहे. संस्कार, संस्कृतीची जोपासना करीत डिजिटली व प्रॅक्टिकली विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हेच सूर्यदत्तचे उद्दिष्ट आहे. भारतीय शिक्षण क्षेत्रात यशस्वीरीत्या आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तींपैकी प्रो. डॉ. संजय चोरडियांचे नाव अग्रणी आहे.

### शाळेपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचा व्यापक विस्तार

■ सूर्यदत्त अंतर्गत ३० हून अधिक संस्थांचा समावेश असून यामध्ये शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण केंद्रे आणि व्यावसायिक शिक्षण संस्थांचा समावेश आहे. ही संपूर्ण साखळी 'KG ते PG' आणि त्याहीपलीकडे शिक्षण देते. यापैकी सुमारे २० संस्थांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (SPPU), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), कुलगुरू कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ (KKSU), डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनिव्हर्सिटी (DBATU), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) मान्यता प्राप्त आहे. तसेच CBSE, MSBTE, MSBSVET इत्यादींचा समावेश होतो. याशिवाय, AICTE, PCI, BCI, विविध स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल्सच्याकडूनही मान्यता प्राप्त आहे.

### भविष्यासाठी सक्षम शिक्षण केंद्र

■ सूर्यदत्त मध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स, ब्लॉकचेन, फिनटेक, टेक्नॉलॉजी, सायबरसुरक्षा, एव्हिएशन इ. क्षेत्रातील कौशल्याधारित आणि तंत्रज्ञानसंपन्न अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. ८० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार, तसेच सिंगापूरमधील AI साठीचे Centre of Excellence यांसोबत सामंजस्य करार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचा अभ्यास आणि नोकरी संधी उपलब्ध होतात. दुबई, सिंगापूर, मलेशिया, यूके, यूएस, कॅनडा, ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांतील पर्यायी अभ्यास सहली विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन देतात.




■ **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास :** सूर्यदत्तमधून UPSC, MPSC, NEET, MBBS, NDA, न्यायसेवा इ. स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन दिले जाते. याशिवाय फ्रेंच, जर्मन यांसारख्या परदेशी भाषा, सॉफ्ट स्किल्स व व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण दिले जाते.

■ **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक NEP धोरणाचे चार स्तंभ प्रवेश, समता, गुणवत्ता आणि जबाबदारी;** हे तत्त्वज्ञान सूर्यदत्त संस्थेच्या स्थापनेपासूनच त्याच्या कार्यामध्ये प्रतिबिंबित झाले आहे. सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी कसेही असो, प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा संस्थेचा कटाक्ष आहे.

■ **सामाजिक बांधिलकीतून नेतृत्व :** सूर्यदत्त Edu-Socio Connect द्वारे सामाजिक बांधिलकीचे उपक्रम राबविले जाते. दिवंगत रतनबाई आणि बन्सीलालजी चोरडिया यांच्या प्रेरणेतून शेतकऱ्यांसाठी, दिव्यांग, सार्वजनिक कर्मचारी, लष्कर अधिकारी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, निष्ठावान कर्मचाऱ्यांसाठी मोफत कौशल्य शिक्षण व प्रशिक्षणही दिले जाते.

■ **विविध विक्रम, पुरस्कार व मान्यतांमधून सन्मान :** ८० हून अधिक स्वयंसेवी संस्थांद्वारे जनजागृती, करिअर मार्गदर्शन व समाजोन्नती कार्यक्रम राबवले जातात. सूर्यदत्त राष्ट्रीय पुरस्कार कार्यक्रमात पं. भीमसेन जोशी, डॉ. बीकेएस अय्यंगार यांच्यासारख्या महान व्यक्तींना गौरवण्यात आले आहे. सूर्यदत्त ने ७००० किलो महा मिसळ, २४ तासांचे शांत वाचन ( रीडाथॉन ), योग व हास्य उपचार अशा अनोख्या उपक्रमांतून 12 + वर्ल्ड रेकॉर्ड्स नोंदवले आहेत.

■ **स्टार्टअप उभारणीत पुढाकार :** संस्थेमार्फत इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेंटरची निर्मिती करण्यात आली असून, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीस बळ मिळण्यासाठी संस्थेच्या वतीने प्रयोगशाळा स्थापण्यात आल्या आहेत.

■ **विश्वासार्ह प्लेसमेंट मधील सातत्य :** उमेदवारांच्या शाश्वत वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्य विकासावर भर देणारी ही c विद्यार्थ्यांना आघाडीच्या राष्ट्रीय -आंतरराष्ट्रीय क्षेत्रात करिअरचे पर्याय उपलब्ध करून देते.



**प्रो. डॉ. संजय बी. चोरडिया**
संस्थापक अध्यक्ष : सूर्यदत्त एजुकेशन फाऊंडेशन

### तंत्रज्ञानाची प्रगती अनुभवत 'सूर्यदत्त' कायमच आघाडीवर

तंत्रज्ञानाची प्रगती आपण अनुभवत आहोत . 'एआय'च्या क्रांतीने सर्व क्षेत्रांचा चेहरामोहराच बदलला आहे. या पार्श्व भूमीवर शैक्षणिक संस्थांनाही हे नवे बदल स्वीकारून, त्यांच्या उपयुक्ततेनुसार स्वतःच्या ढाच्यात बदल करावा लागतो. याबाबतीत 'सूर्यदत्त' कायमच आघाडीवर असते.

### वैशिष्ट्ये

- डिजीटल इन्फ्रास्ट्रक्चर
- ए आय इनोव्हेशन इन्क्युबेशन ॲन्ड स्टार्टअप इनेबल्ड कॅम्पस
- इंटर - मल्टीडिसीप्लनरी एनएलपी कम्प्लाइड कॅम्पस
- आधुनिक शिक्षण साधनांसह प्रत्येक वर्ग खोली
- संगणक/ इंटरनेट रूम
- मोबाईल लॅब / ॲड लॅब
- रिसर्च सेंटर
- सेमिनार हॉल, कॉन्फरेन्स हॉल, ऑडिटोरियम, ॲम्पीथिएटर
- इनडोअर-आऊटडोअर गेम्स, जिम, योगा अँड् मेडिटेशन हॉल, कॅफेटेरिया



ग्लोबल कॉन्क्लेव्ह ऑन चॅलेंजेस'ला प्रख्यात उद्योगपती टोनीनो लँबोर्गिनी यांची उपस्थिती




सुर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, पुणे आणि नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फार्मसी क्षेत्रातील उत्कृष्टता, ऐतिहासिक फार्मोत्सव २०२५ पुरस्कार समारंभ.